SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

कुटुंब, मित्र आणि निसर्गासोबत एक अविस्मरणीय दिवस! हा सुट्टीचा महाआनंद आणि धमालच धमाल....
आमरस पार्टी वनभोजन
रेन डान्स / बोटींग / पपेट शो बर्डपार्क / झीप लाईन ॲडव्हेंचर्स / वॉटर स्पोर्टस्
डॉ. कांकरियांचे साईबन
9112288622
9850500905 / 9096639368
डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी.मागे, अहिल्यानगर

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २७.०५.२०२६ | अंक नं. ०४८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल... सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

अधिक मास आता बनवा अधिक खास
खास धोंड्यानिमित्त जावाई व मुलीला वाण देण्यासाठी आकर्षक व वेगवेगळ्या वजनामधील चांदीची भांडी उपलब्ध.
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

# प्राजक्त तनपुरेंच्या उमेदवारीबाबत २८ मे पर्यंत निर्णय

## मुख्यमंत्र्यांनी दिले होते विधानपरिषदेचे आश्वासन; पण भाजपकडून पक्ष प्रवेशाची अट?



नगर – जिल्ह्यात विधानपरिषदेच्या निवडणुकीचे वारे वाहत असतानाच महायुती आणि महाविकास आघाडीकडून अद्यापही उमेदवार निश्चित झालेला नाही. अर्ज दाखल करण्याची मुदत १ जूनपर्यंत आहे. त्यामुळे ऐनवेळी उमेदवारी जाहीर करून अर्ज दाखल करण्यात येईल, अशी शक्यता निर्माण झाली आहे. राष्ट्रवादीचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे हे भारतीय जनता पार्टीचे उमेदवार असतील, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. मात्र, तनपुरे यांनी माझ्या उमेदवारीबाबत काहीही ठरलेले नाही. २८ मेपर्यंत थांबा, त्यानंतर निश्चित माहिती सांगतो, असे वक्तव्य दैनिक नवा मराठाशी बोलताना केले.

दरम्यान राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीवेळी तनपुरे यांनी मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनांनुसार उमेदवारी केली नव्हती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तनपुरे यांना विधानपरिषदेचे आश्वासन दिले होते, अशी माहिती आहे. मात्र, आता त्यांना उमेदवारी देताना आधी त्यांचा पक्ष प्रवेश झाला पाहिजे, अशी अट भाजपच्या वरिष्ठांकडून ठेवण्यात आली असल्याचे समजते. त्यामुळे तनपुरे यांचा जोपर्यंत पक्ष प्रवेश होत नाही, तोपर्यंत त्यांच्या उमेदवारीबाबत निर्णय होणार नाही, असे भाजपमधील सुत्रांनी सांगितले. तर दुसरीकडे उमेदवारीचा निर्णय होत नाही, तोपर्यंत पक्ष प्रवेश करणार नाही, असा पवित्रा तनपुरे यांनी घेतल्याचे समजते. त्यामुळेच भाजपकडून अद्याप उमेदवार जाहीर केला जात नसल्याचे समजते.

विधानपरिषदेसाठी जिल्ह्यात ४६१ मतदार आहेत. त्यापैकी भाजपचेच जवळपास २०७ मतदार आहेत. भाजपचे हे मतदार निर्णायक ठरणार आहेत. सर्वाधिक हक्काचे मतदार असल्याने ही जागा भाजपकडेच ठेवून पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्याला उमेदवारी मिळावी असा कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचा आग्रह आहे. तसेच भाजपकडूनही उमेदवारीबाबत चाचपणी सुरु आहे. तर मागील द्विवार्षिक निवडणुकीत ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे होती. त्यावेळी राष्ट्रवादी हा पक्ष एकत्र होता. आता परिस्थिती बदलेली आहे. राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि शरद पवार गट यांच्या नेत्यांकडून नगरच्या जागेबाबत आग्रह होताना दिसत नाही. किंबहुना उमेदवाराची चाचपणीही होताना दिसत नाही.

### महाविकास आघाडीची बैठकच नाही : खासदार निलेश लंके

महाविकास आघाडीत विधानपरिषदेच्या निवडणुकीबाबत अद्याप एकही बैठक झालेली नाही. उमेदवारीबाबत कोणीही विचारणा केलेली नाही. एकदम सामसूम अवस्था महाविकास आघाडीत दिसून येत आहे. याबाबत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार निलेश लंके म्हणाले, महाविकास आघाडी म्हणून आमची अजून बैठक झालेली नाही. उमेदवारी कोणाला द्यायची? याबाबत अजून काहीही ठरलेले नाही. उमेदवार निश्चित झाल्यानंतर आम्ही जाहीर करु.

### देवळाली प्रवराच्या कदमांनी घेतला अर्ज

भाजपचे देवळाली प्रवराचे माजी आमदार चंद्रशेखर कदम यांच्या स्नुषा आणि देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्या पत्नी प्रिती कदम यांनी विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी दोन अर्ज घेतले आहेत. कदम घराणे हे भाजपशी निष्ठावान घराणे आहे. कदम हे देखील विधानसभेसाठी इच्छूक होते. मात्र, पक्षाचा निर्णय मान्य करुन त्यांनी थांबून घेतले होते. त्यामुळे ऐनवेळी कदम यांच्या उमेदवारीचाही निर्णय होऊ शकतो, अशीही एक शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### भाजपकडे सर्वाधिक मतदार

विधानपरिषदेसाठी नगरपंचायत, नगरपालिका, महापालिका यांच्यामधील नगरसेवकांना मतदानाचा अधिकार मिळणार आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका लांबवणीवर पडलेल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत केवळ नगरसेवकांनाच विधानपरिषदेच्या उमेदवाराला मतदान करता येणार आहे. अशा परिस्थितीत भाजपकडे सर्वाधिक २०७ नगरसेवक, त्याखालोखाल राष्ट्रवादी (अजित पवार गट) कडे ६० नगरसेवक आहेत. या मतदारांचा विचार केला तर भाजपकडे सर्वाधिक मतदार असल्याचे दिसते.

### पालिकांमधील पक्षीय बलाबल

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | २०७ |
| राष्ट्रवादी | ६० |
| शिवसेना | ४७ |
| काँग्रेस | ३१ |
| संगमनेर आघाडी | ३१ |
| राष्ट्रवादी श.प. | ३० |
| राहुरी आघाडी | २० |
| क्रांतीकारी पक्ष | ११ |
| अपक्ष | ८ |
| उबाठा | ६ |
| वंचित | ३ |
| एमआयएम | २ |
| इतर | ४ |
| एकूण | ४६१ |

# भांडी धुण्याचे लिक्विड तयार करण्यासाठीचे डिशवॉश किट ठरतेयं धोकादायक



नगर – शहरात सध्या १०० ते १५० रुपयांमध्ये विकल्या जाणाऱ्या तथाकथित डिशवॉश मेकिंग किट्समुळे आरोग्याचे गंभीर धोके निर्माण होत असल्याची माहिती समोर आली आहे. स्थानिक बाजारपेठा, किरकोळ दुकाने आणि काही भागांत घरपोच पद्धतीने विकल्या जाणाऱ्या या किट्समध्ये निकृष्ट व धोकादायक रसायनांचा वापर होत असल्यामुळे त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे आरोप नागरिकांकडून केले जात आहेत.

घरच्या घरी भांडी धुण्याचे लिक्विड तयार करण्यासाठी विकल्या जाणाऱ्या या किट्समध्ये ॲसिड स्लरी, कॉस्टिक सोडा आणि युरिया यांसारख्या तीव्र रासायनिक घटकांचा वापर होत असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, या उत्पादनांवर कोणतीही प्रमाणित प्रयोगशाळा तपासणी, उत्पादन परवाना किंवा सुरक्षिततेविषयक स्पष्ट माहिती नसल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. हे लिक्विड वापरुन भांडी धुणाऱ्या व्यक्तींच्या हातांवर रासायनिक दाह, त्वचा कोरडी पडणे, जखमा होणे आणि त्वचेचे थर निघण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात. तसेच भांडी व्यवस्थित धुतली गेली नाहीत तर या रसायनांचे सूक्ष्म अंश भांड्यांवर राहण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत अन्नाद्वारे शरीरात ही रसायने जाण्याचा धोका नाकारता येत नाही. दीर्घकाळ असे झाल्यास यामुळे यकृत, मूत्रपिंड आणि पोटाशी संबंधित विकार निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दररोज भांडी घासणाऱ्या गृहिणींच्या हातांवर पुरळ, जळजळ, चिरा आणि त्वचारोगांची लक्षणे दिसत असल्याचीही समोर येत आहे. विशेष म्हणजे या किट्सवर उत्पादकाचे नाव, उत्पादन तारीख, घटकांची माहिती किंवा सुरक्षा सूचना नसल्याचेही निदर्शनास आले आहे. अशा किट्सची विक्री, उत्पादन आणि साठवण यांची अन्न व औषध प्रशासन, महापालिका आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन; गुन्हा दाखल

नगर – जिल्ह्यातून हद्दपार केलेला असतानाही कोणतीही परवानगी न घेता भिंगार हद्दीत प्रवेश करणाऱ्या एका तरुणावर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई २५ मे रोजी रात्री १०:३० च्या सुमारास करण्यात आली. करण रामदास भिंगारदिवे (वय २४, रा. गौतमनगर, भिंगार) याला उपविभागीय दंडाधिकारी, अहिल्यानगर यांच्या आदेशानुसार ६ महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते. मात्र, हद्दपारीचा कालावधी सुरू असतानाही, त्याने प्रशासनाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता आपल्या राहत्या घरी येऊन हद्दपारीच्या आदेशाचा भंग केला. याबाबत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पो.कॉ. प्रमोद लहारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १४२ अन्वये करण भिंगारदिवे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर - ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com
स्त्रीरोग व गर्भवती महिला मोफत तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबीर
शुक्रवार दि. २९-०५-२०२६ * वेळ : सकाळी १० ते २
तज्ञ डॉक्टर्स : डॉ. रविंद्र मुथा (M.D., OBGY), डॉ. कृतिका पाटील (M.B.B.S.,M.S.)
Laproscopic Tubectomy (दुर्बिणीद्वारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया) 10,000/-
LSCS (सिझेरियन) 12,000/-
Normal Delevery (नॉर्मल डिलेव्हरी) 8,000/-
Hysterectomy (गर्भाशयाची पिशवी काढणे) Open 12,000/- Laproscopy 20,000/-
Ovarian Tumor Excision (बिजांड पोशावरील गाठी काढणे) Open 10,000/- Laproscopy 20,000/-
Hysteroscopy (गर्भाशयाची तपासणी करिता गर्भनलिकेची ट्युबल पेटेन्सी) 8,500/-
HSG (हिस्टेरोसालपिंजोग्राफी) 2,000/-
Endometrial Biopsy (गर्भाशयाच्या आतल्या अस्तराचा तुकडा तपासणे) 2,000/-
* औषधांचा खर्च वेगळा लागेल.
१) गर्भवती स्त्रियांच्या सर्व चाचण्या (उदा. सोनोग्राफी, रक्ताच्या चाचण्या) लसीकरण तसेच रक्तवाढीचे व न्युट्रीशनल मेडिसीन सवलतीच्या दरात दिले जातील.
२) गर्भवती महिलांसाठी आहाराचा सल्ला तसेच घ्यावयाची काळजी याबद्दल तज्ञांकडून मार्गदर्शन केले जाईल.
एम.आर.आय. रात्री 1.00 ते पहाटे 5.00 या वेळेत रू. 2500/- एम.आर.आय. केल्यास रु. 750/- ची सुट संपर्क : 9404297411
डिजिटल एक्सरे रू. 250/- सोनोग्राफी रू. 800/- संपर्क : 9405271878
सिटीस्कॅन रू. 1250/- संपर्क : 9404299911
24 तास आपत्कालिन सेवा उपलब्ध
होम ब्लड सॅम्पल कलेक्शन मो. नं. 9373807842
हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधुनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर - ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com

THE ART OF LIVING
आर्ट ऑफ लिविंग -अहिल्यानगर
INTUITION PROCCESS
मुलांचे अंतर्ज्ञानाची शक्ती जागृत करा
आपण सर्वजण आपल्या इंद्रियांच्या पलीकडे जाण्याची नैसर्गिक क्षमता घेऊन जन्माला आला आहोत. हे विशेषतः अशा मुलांमध्ये दिसून येते ज्यांचे मन निरागस, निसर्गाशी अधिक सुसंगत आहे
आपल्या मुलांची क्षमता ओळखा अंतर्ज्ञानाने भविष्य घडवा
फायदे
६ वे इंद्रिय विकसीत करते
फोटोग्राफिक मेमरी विकसीत करते
बुध्दी तीक्ष्ण, सर्जनशिलता वाढते
एकाग्रता वाढते, भीती कमी होते
स्मरणशक्ती, आत्मविश्वास वाढते
निर्णयक्षमता, ज्ञानेंद्रिय क्षमता वाढते
अज्ञान, चिडचिड, अभ्यासात सुधारणा
विचारांमध्ये स्पष्टता व बरेच काही...
Batch Date : 29 मे ते 14 जून 2026
IP Kids (8 ते 13 वर्षे) वेळ : संध्या. 4 ते 6
IP Teens (13 ते 18 वर्षे) वेळ : संध्या. 6 ते 8
ठिकाण : श्रावक भवन, चितळे रोड, चौपाटी कारंजा जवळ दिल्लीगेट, अहिल्यानगर
नाव नोंदणीसाठी लिंकवर क्लिक करा https://linktr.ee/krushnapendam20167
अंतर्ज्ञानाची शक्ती.. यशस्वी भविष्यासाठी पहिले पाऊल !
Contact : 9422220874 | 9130377551

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
पुरुषांसाठी व मोठ्या मुलांसाठी
बिगसाईज ब्रॅण्डेड रेडिमेड कपडे
शर्ट,क्रुडशेट 7XL पर्यंत | टिशर्ट 6XL पर्यंत | नाईटपॅन्ट 4XL पर्यंत | जिन्स,फॉर्मल पॅन्ट 44 साईज पर्यंत
किंमत होलसेल व ऑनलाईन पेक्षा स्वस्त
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही मयुरी लेडिज मॉलच्या वर
वेळ : सकाळी १०.३० ते रात्री ८.३० पर्यंत
शुभ मॉल
माळीवाडा चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# केडगाव येथे जुन्या वादातून तरुणावर लोखंडी रॉडने हल्ला; दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - केडगाव परिसरामध्ये देवी मंदिर रोडवर एका तरुणावर जुन्या वादातून लोखंडी रॉडने आणि लाथाबुक्क्यांनी जीवघेणा हल्ला केल्याची घटना २५ मे रोजी दुपारी २ च्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रदिप नारायण चव्हाण (वय २३, रा. मोहिनी नगर, केडगाव) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे सफाई कामगार म्हणून काम करतात. २५ मे रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास ते केडगावदेवी रोड ते केडगाव वेस दरम्यान असलेल्या ओढ्याच्या पुलावर थांबलेले होते. त्या वेळी तिथे आलेल्या आरोपींनी त्यांना गाठले. पूर्ववैमनस्यातून आरोपी सूर्या जाटला काळे याने फिर्यादी प्रदिप यांच्यावर लोखंडी रॉडने जोरदार हल्ला केला. हा वार प्रदिप यांच्या डोक्याला डाव्या बाजूला कानाच्या वर लागल्याने ते गंभीर जखमी झाले.

त्याच वेळी दुसरा आरोपी कुणाल सूर्या काळे याने प्रदिप यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करत शिवीगाळ केली आणि ठार मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर जखमी प्रदिप यांनी तात्काळ पोलीस ठाणे गाठून घडलेल्या प्रकाराबाबत तक्रार दिली.

त्यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपी सूर्या जाटला काळे आणि कुणाल सूर्या काळे (दोघे रा. दुधसागर सोसायटी, केडगाव) यांच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास महिला पोलीस अंमलदार अनिता तारडे या करत आहेत. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर नगर शहरामध्ये शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना कराव्यात

### सोशल मीडियावरील अफवांवर कारवाई, नमाजवेळी चोख बंदोबस्त आणि स्वच्छता व्यवस्था करा: जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन



शहरात बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर आयोजित शांतता समितीच्या बैठकीदरम्यान मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांना निवेदन दिले.

नगर - २८ मे रोजी साजरी होणाऱ्या बकरी ईद (ईद-उल-अजहा) सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना कराव्यात, तसेच भारताच्या कृषीप्रधान संस्कृतीत गाईला असलेले महत्त्व लक्षात घेऊन तिला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्याबाबत केंद्र सरकारकडे सकारात्मक शिफारस पाठवावी, अशी मागणी मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी, शांतता समितीचे सदस्य आणि आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे.

शहरात बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर आयोजित शांतता समितीच्या बैठकीदरम्यान मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांना निवेदन दिले. यावेळी आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, माजी नगरसेवक समद खान, मौलाना शफीक कासमी, खालिद शेख, अकबर अली शेख, नईम सरदार, संजू जहागीरदार, मोहसिन शेख यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बकरी ईद सण शांततेत आणि कायद्याच्या चौकटीत पार पडावा, यासाठी मुस्लिम समाज प्रशासनाला पूर्ण सहकार्य करेल. मात्र सणाच्या काळात काही समाजकंटक सोशल मीडियावर खोट्या किंवा जुन्या पोस्ट व्हायरल करून वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे व्हॉट्सप, इन्स्टाग्रामसह विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सायबर पोलिसांनी आधीपासूनच लक्ष ठेवून अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच कायदेशीर पद्धतीने मटणाची वाहतूक किंवा वाटप करणाऱ्या नागरिकांना केवळ संशयाच्या आधारावर अडवून कायदा हातात घेणाऱ्या आणि मारहाण करणाऱ्या समाजकंटकांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली. मुख्य नमाजच्या वेळी शहरातील ईदगाह आणि प्रमुख मशिदी परिसरात पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे आवाहनही प्रशासनाला करण्यात आले आहे.

आरोग्य, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांबाबतही निवेदनात विशेष मुद्दे मांडण्यात आले. कुर्बानीनंतर निर्माण होणारा कचरा आणि अवशेष तात्काळ उचलण्यासाठी महानगरपालिकेने विशेष पथके व घंटागाड्या तैनात कराव्यात, तसेच दुर्गंधी टाळण्यासाठी जंतुनाशक फवारणी युद्धपातळीवर करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. सणाच्या काळात संबंधित भागात अखंडित पाणीपुरवठा आणि वीजपुरवठा सुरळीत राहावा, यासाठीही प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निवेदनात नमूद आहे.

मुस्लिम समाजाच्या वतीने प्रशासनाला हेही आश्वासन देण्यात आले की, मशिदींमधून नागरिकांना नियमांचे पालन, स्वच्छता राखणे आणि शांतता टिकवून ठेवण्याचे आवाहन करण्यात येईल. प्रशासनाने अधिकृत अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक आणि कचरा व्यवस्थापनाबाबत पूर्वनियोजन केल्यास समाजाकडूनही पूर्ण सहकार्य दिले जाईल, असे शिष्टमंडळाने स्पष्ट केले.

### गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्याची शिफारस करा

निवेदनातील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्याची मागणी हा ठरला. भारताच्या कृषीप्रधान संस्कृतीत 'गोमाता' हे कोट्यवधी हिंदू बांधवांचे श्रद्धास्थान असून मुस्लिम समाज त्या भावनांचा पूर्ण आदर करतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. समाजात कायमस्वरूपी शांतता, बंधुभाव आणि परस्पर विश्वास वृद्धिंगत व्हावा, तसेच गोवंश रक्षणाला चालना मिळावी यासाठी गाईला 'राष्ट्रीय पशू'चा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

ही बाब अत्यंत संवेदनशील आणि राष्ट्रहिताची असल्याने अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाने केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाकडे यासंदर्भात सकारात्मक शिफारस पाठवावी, अशी विनंती शिष्टमंडळाने केली आहे.

# गाईला राष्ट्रीय पशू घोषित करण्याचा निर्णय केंद्र सरकारने तातडीने घ्यावा

### सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मागणी




गाईला राष्ट्रीय पशू घोषित करण्याबाबत केंद्र सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, या मागणीचे निवेदन सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

नगर - भारतीय कृषी व्यवस्था, ग्रामीण अर्थकारण, दुग्ध व्यवसाय व पशुपालन क्षेत्राचा कणा असलेल्या गाईला भारत सरकारने तात्काळ राष्ट्रीय पशू म्हणून घोषित करावे, अशी मागणी सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटना यांच्या वतीने करण्यात आली. सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेचे महानगर शहर जिल्हाध्यक्ष अलतमश सलीम जरीवाला यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी पंकज आशिया व जिल्हा पोलीस अधीक्षक मम्माका सुदर्शन यांना निवेदन देण्यात आले असून, सदर मागणी राज्य शासन व केंद्र शासनाकडे तातडीने पाठविण्याची विनंती करण्यात आली आहे. यावेळी फिरोज शेख, अजहर शेख, वसीम खान, नदीम शेख, सय्यद साहिल, साबीर खान व आदी उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भारत हा कृषिप्रधान देश असून देशातील लाखो शेतकरी, पशुपालक, दुग्ध उत्पादक व ग्रामीण अर्थव्यवस्था थेट पशुधनावर अवलंबून आहे. गोवंशाचे दुग्ध उत्पादन, सेंद्रिय शेती, नैसर्गिक खत निर्मिती, ग्रामीण रोजगारनिर्मिती व आर्थिक सक्षमीकरणामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान आहे. तसेच भारतीय सांस्कृतिक, सामाजिक व पारंपरिक जीवनपद्धतीत गाईचे विशेष स्थान असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. देशातील गोवंश संवर्धन, पशुपालन विकास आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकटी देण्यासाठी केंद्र सरकारने गाईला राष्ट्रीय पशूचा दर्जा प्रदान करून प्रभावी राष्ट्रीय धोरण जाहीर करावे, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली.

तसेच देशभरातील गोशाळा, पशुपालक, दुग्ध व्यवसायिक व शेतकरी वर्गासाठी विशेष आर्थिक सहाय्य, संरक्षणात्मक योजना, अनुदान व प्रोत्साहनपर धोरणे राबविण्याची आवश्यकता असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. शासनाने या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करताना, देशाच्या कृषी विकास, ग्रामीण रोजगार व पशुधन संवर्धनाच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे अलतमश जरीवाला यांनी म्हटले आहे.

## बकरी ईदनिमित्त ईदगाह मैदानावर २८ मे रोजी सामुदायिक नमाज



नगर - शहरात गुरुवारी (दि.२८ मे) ईद उल अज्हा (बकरी ईद) मुस्लिम बांधवांच्या वतीने साजरा होणार आहे. सकाळी ९:३० वाजता ईदगाह मैदानावर सामुदायिक नमाज अदा केली जाणार आहे. सर्व मुस्लिम बांधवांनी वेळेत पोहचून ईदची नमाज अदा करण्याचे आवाहन अहमदनगर यतीमखाना हिलाल कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## नगर-कल्याण रोडवरील नेप्ती शिवारातून मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर - नगर कल्याण रोड वरील नेप्ती शिवारात असलेल्या द्वारका लॉन्स, परिसरातून 'हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर प्लस' मोटारसायकल (क्र.एमएच १६एएफ४४४८) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ मे रोजी दुपारी घडली आहे.

याबाबत महेश मधुकर वाघमारे (वय २१, रा. तिनखडी, ता. पाथर्डी, सध्या रा. बालिकाश्रम रोड, नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'पुमा' कंपनीचे बनावट कपडे विकणाऱ्या अहिल्यानगरमधील दोन दुकानांवर छापे

### २ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त, तिघा जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर - प्रसिद्ध नामांकित कंपनीचा बनावट लोगो वापरून कपड्यांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या टोळीचा तोफखाना पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण २ लाख ३४ हजार ४५० रुपयांचा बनावट मुद्देमाल जप्त केला असून दोन आरोपींना अटक केली आहे, तर एक आरोपी फरार झाला आहे.

या प्रकरणी 'पुमा' कंपनीचे प्रतिनिधी महेंद्र सोहन सिंग (वय ३६, रा. राजस्थान) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी शाहरुख इस्माईल शेख (वय २४, रा. बाराबाभळी, अहिल्यानगर), अरबाज राजू बागवान (वय २३, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) आणि सौरभ रमेश सुडके (वय २४, रा. सुडके मळा, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध कॉपीराईट कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. यातील आरोपी शाहरुख शेख हा फरार झाला असून अरबाज बागवान आणि सौरभ सुडके या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.

बालीकाश्रम रस्ता परिसरातील 'शिव स्पोर्ट्स अँड शुज मॉल' आणि 'आर. जी. स्पोर्ट्स अँड शुज मॉल' या दोन दुकानांमध्ये ही कारवाई करण्यात आली. आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी नामांकित कंपनीचे बनावट टी-शर्ट, ट्रॅक पॅन्ट, जॅकेट आणि मोजे यांवर हुबेहूब लोगो लावून त्यांची विक्री करत होते. पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणावर बनावट कपडे आणि छापील टॅग हस्तगत करण्यात आले आहेत. पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी पुढील तपास करत आहेत.

# गावठी पिस्तुल, कोयता, चाकू आणि मिरची पूडसह दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी पोलिसांनी पकडली

नगर - भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोडा टाकण्याच्या उद्देशाने घातक हत्यारांसह एकत्र आलेल्या चार सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून पकडले आहे. या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून एक गावठी पिस्तुल, जिवंत काडतूस, कोयता, चाकू आणि मिरची पूड असा एकूण १ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल केला असून एकाचा शोध सुरू आहे.

बुऱ्हाणनगर रोडवरील मिरावली पहाडाच्या पायथ्याशी काही तरुण संशयास्पद रित्या थांबले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी आणि पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे यांच्या पथकाने वारूळवाडी परिसरात छापा टाकला. यावेळी पोलिसांनी मुस्ताक इब्राहिम शेख (वय २२), विराट ऊर्फ विल्यम रवींद्र मेहंदळे (वय २६), समर्थ बाबासाहेब मांडळकर (वय १९) आणि समर्थ राजेंद्र दुधभाते (वय १८, सर्व रा. कोंढवा, पुणे) या चौघांना ताब्यात घेतले. तर त्यांचा एक साथीदार आकाश संजय पवार (रा. ब्रम्हतळे, भिंगार) हा पोलिसांना चकवा देऊन पळून जाण्यात यशस्वी झाला.

पोलिसांनी पकडलेल्या आरोपींची अंगझडती घेतली असता, विराट मेहंदळे याच्याकडे ४० हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तुल आणि जिवंत काडतूस सापडले. मुस्ताक शेख याच्याकडे धारदार कोयता, समर्थ दुधभाते याच्याकडे स्टीलचा बटनचा चाकू आणि समर्थ मांडळकर याच्याकडे लाल मिरचीची पूड मिळून आली. तसेच त्यांच्याकडे वेगवेगळ्या कंपन्यांचे चार महागडे मोबाईल फोन देखील जप्त करण्यात आले आहेत. हे सर्व आरोपी घातक हत्यारांसह कोठेतरी मोठा दरोडा टाकण्याच्या पूर्वतयारीत असल्याचे तपासात समोर आले आहे.

याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार सुनील विनायक पवार यांनी कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि आर्म ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सहाय्यक निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार गारुडकर या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## आशाबाई ससे यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर - नगर तालुक्यातील सारोळा कासार येथील आशाबाई सुभाष ससे (वय ६०) यांचे २७ मे रोजी सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर दुपारी सारोळा कासार येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती, १ विवाहित मुलगा, सून, १ विवाहित मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सारोळा कासार गावचे माजी सरपंच भाऊसाहेब काळे यांच्या कै. आशाबाई या ज्येष्ठ कन्या होत.

## वसंतराव शिंदे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - दिल्लीगेट, बागरोजा हडको येथील रहिवासी वसंतराव पिराजी शिंदे (वय ८६) यांचे २६ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, भाऊ, भावजया, सुना, नातवंडे असा परिवार आहे. दिल्लीगेट व्यापारी असोसिएशनचे नंदेश शिंदे, शाम, गोपाल शिंदे यांचे ते वडील होत.

## शिरीष सारंगधर यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सचे शरीर रचना विभागाचे आर्टिस्ट व मॉड्युलर शिरीष शांताराम सारंगधर (वय ७१) यांचे २६ मे रोजी सायं.५:३० वा. अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, दोन बंधू, पुतणे, पुतणी असा परिवार आहे. अनिल व सुनिल सारंगधर यांचे ते थोरले बंधू तर नेहा, डॉ.वैष्णवी, सिद्धी व श्रीधर सारंगधर यांचे चुलते होत.

# लालटाकी परिसरात चौघांनी तरुणावर कोयत्याने केले वार

नगर - शहरातील लालटाकी परिसरातील अनिता वाईन शॉपसमोर किरकोळ कारणावरून चार अनोळखी व्यक्तींनी एका मजुराला बेदम मारहाण केली. या घटनेत रोहित बबन शिंदे (वय २७, रा. वारुळाचा मारुती, नालेगाव) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रोहित शिंदे हा मजूर म्हणून काम करतो. २५ मे रोजी रात्री ११:१५ वाजण्याच्या सुमारास तो अनिता वाईन शॉपच्या समोरून जात असताना अचानक चार अनोळखी व्यक्ती तिथे आल्या. त्यांनी रोहितला कोणत्याही कारणाशिवाय विनाकारण शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. रोहितने विरोध करण्याचा प्रयत्न केला असता, त्या चारही जणांनी त्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली.

हा वाद एवढ्यावरच थांबला नाही, तर त्या चार अनोळखी व्यक्तींपैकी एकाने आपल्या हातातील कोयत्यासारख्या लोखंडी हत्याराने रोहितवर थेट हल्ला केला. हा वार रोहितच्या उजव्या खांद्यावर लागल्याने तो गंभीर जखमी होऊन खाली पडला. घटनेनंतर हल्लेखोर तेथून पसार झाले. जखमी रोहितला तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

या घटनेप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२) आणि ३५२ प्रमाणे चार अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक एम. एन. गोटला आणि पोलीस अंमलदार व्ही. सी. गंगावणे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस अंमलदार के. बी. गडाख करत आहेत.

## एमआयडीसीतील कंपनीतून ७.४२ लाखांच्या चांदीच्या पार्टची चोरी

नगर - नगर एमआयडीसी परिसरातील 'प्रथमेश इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेड' कंपनीच्या स्टोअर रूमम धून तब्बल ७ लाख ४२ हजार ५०० रुपये किमतीचे चांदीचे पार्ट चोरीला गेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चोरीची ही घटना २१ मे रोजी सायंकाळी ४:३० ते २२ मे रोजी दुपारी २:०० वाजेच्या दरम्यान घडली. अज्ञात चोरट्याने कंपनीच्या स्टोअर रूममधील लोखंडी रॅकमधून चांदीचे पार्ट चोरून नेले आहेत.

याबाबत कंपनीचे स्टोअर मॅनेजर प्रदीप प्रभाकर गायकवाड (वय ४७, रा. भिस्तबाग चौक, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून, एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) नुसार चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणाचा पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक जाधव हे करत आहेत.

औद्योगिक वसाहतीत भरदिवसा झालेल्या या चोरीच्या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# साकत घाटात भाविकांच्या मिनी ट्रॅव्हल बसला अपघात



साकत घाटात खड्ड्यात पलटी झालेली मिनी ट्रॅव्हल बस.

जामखेड - औढा नागनाथ वरून जेजुरी पुण्याकडे जात असलेल्या भाविकांच्या मिनी ट्रॅव्हल बसला जामखेड तालुक्यातील साकत घाटात २७ मे रोजी पहाटे २ वाजेच्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघातात ४ जण गंभीर जखमी झाले असून इतर १८ ते २० जण किरकोळ जखमी झाले आहेत.

मध्यप्रदेश येथील बऱ्हाणपूर येथून काही भाविक मिनी ट्रॅव्हल भाड्याने करून मुक्ताईनगर, शेगाव, औढा नागनाथ, तुळजापूर करून जेजुरी पुण्याकडे चालले होते. रात्री दोन च्या आसपास घाटात एका गाडीला ओव्हरटेक करून वळणाचा अंदाज न आल्याने गाडी संरक्षक कठडा व दिशादर्शक फलकाला धडक देऊन सरळ खाली खड्ड्यात पडली यात चौघे गंभीर जखमी झाले आहेत तर वीस जण किरकोळ जखमी झाले आहेत.

यावेळी एकच हाहाकार उडाला, कोणाच्या हाताला जखम, कोणाच्या पायाला जखम, कोणाचे डोके फुटले, कोणाचा हात तर कोणाचा पाय मोडला. रात्री अंधारात अपघातग्रस्तांचा आरडाओरडा सुरू होता. यावेळी रस्त्यावरून जाणाऱ्या दुसऱ्या गाड्या थांबून सर्व जखमींना समोरून बाहेर काढले रुग्णवाहिकेस फोन करून जखमींना जामखेड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

यातील वंदना कैलास महाजन, योगिता ज्ञानेश्वर महाजन, अनिल काशिनाथ महाजन व ड्रायव्हर गौरव महाजन हे चार जण जखमी झाले. यांच्यावर प्राथमिक उपचार करून नगरला पाठविले आहे सध्या ते नगर येथे उपचार घेत आहेत यातील वंदना व योगिता यांना पुणे येथे हातापायावर शस्त्रक्रिया करण्यासाठी पाठवले अशी माहिती नातेवाईकांनी दिली आहे. काही प्रवासी तर काचेतून बाहेर पडले. अपघातातील अनेकांना मुका मार लागला आहे. घटनेची माहिती मिळताच जामखेड पोलीसांनी घटनास्थळी जात पंचनामा केला आहे.

साकत घाटात नेहमीच लहान मोठे अपघात होत आहेत त्यामुळे लवकरात लवकर घाटाचे वळणे कमी करून रस्ता रूंद करावा अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### बद्धकोष्ठतेवर उपाय

बद्धकोष्ठता म्हणजे पोट साफ न होणे, शौचास कडक होणे व पोट जड वाटणे. चुकीचा आहार, कमी पाणी, मैदा, व्यायामाचा अभाव यामुळे हा त्रास होतो. यावर उपाय म्हणून सकाळी उठल्यावर २ ग्लास कोमट पाणी रिकाम्या पोटी प्या व रात्री ५ मनुके पाण्यात भिजवून सकाळी खा. जेवणात हिरव्या पालेभाज्या, कोशिंबीर व फळांचा समावेश करा, विशेषतः पपई, पेरू व केळी खा. रात्री झोपताना १ चमचा इसबगोल गरम दुधातून घ्या व दिवसभर ३ लीटर पाणी पिण्याची सवय ठेवा. मैदा, बेकरी पदार्थ, फास्ट फूड व जास्त चहा-कॉफी पूर्णपणे टाळा. रोज ३० मिनिटे चालणे, पोटाचे हलके व्यायाम व योगासने करा आणि जेवणानंतर १०० पावले शतपावली करा. तूप कोमट पाण्यातून किंवा भातावर घेऊन खा व सकाळी त्रिफळा चूर्ण १ चमचा कोमट पाण्यातून घ्या. शौचाची भावना झाल्यावर वेळ न लावता लगेच जा. ७ दिवसात फरक पडेल.

## पाककला

### जलेबी रबडी स्टार्ट

**साहित्य :** १ वाटी मैदा, २ चमचे कॉर्नफ्लोर, १/४ चमचा बेकिंग सोडा, १ चमचा आंबट दही, चिमूटभर केशर रंग, कोमट पाणी गरजेनुसार, तळण्यासाठी तूप किंवा तेल, पाकासाठी १ वाटी साखर, १/२ वाटी पाणी, ४-५ वेलची पूड, ५-६ केशर काड्या, १/२ लिंबू , रबडीसाठी १ लिटर फुल फॅट दूध, १/२ वाटी साखर, १/२ चमचा वेलची पूड, २ चमचे काजू-बदाम-पिस्ता काप, ८-१० केशर काड्या

**कृती :** मैदा, कॉर्नफ्लोर, बेकिंग सोडा एकत्र करा. त्यात दही व थोडे कोमट पाणी घालून गाठी न होता घट्ट पीठ भिजवा. हे पीठ झाकून उबदार जागी १० ते १२ तास आंबवण्यासाठी ठेवा. आंबल्यावर त्यात केशर रंग व गरज वाटल्यास १ चमचा पाणी घालून मिक्स करा. पातेल्यात साखर व पाणी घेऊन उकळा. एकतारी पाक झाला की त्यात वेलची पूड व केशर घाला. गॅस बंद करून लिंबाचे ४-५ थेंब पिळा, यामुळे पाकात साखर होत नाही. पाक कोमट ठेवा. जाड बुडाच्या पातेल्यात दूध उकळायला ठेवा. उकळी आल्यावर गॅस मंद करा व सतत ढवळत रहा. बाजूला लागणारी साय खरवडून परत दुधात मिक्स करा. दूध एक तृतीयांश राहिल्यावर त्यात साखर, वेलची पूड व केशर घाला. ५ मिनिट उकळवून गॅस बंद करा. गार झाल्यावर ड्रायफ्रूट मिसळा व फ्रिजमध्ये थंड करा. कढईत तूप मध्यम आचेवर गरम करा. आंबलेले बॅटर सॉस बॉटल, दुधाच्या पिशवीत किंवा कापडात भरून गरम तुपात गोल गोल जलेबी सोडा. दोन्ही बाजूंनी कुरकुरीत व सोनेरी होईपर्यंत तळा. तळलेली गरम जलेबी लगेच कोमट पाकात ३० सेकंद बुडवून बाहेर काढा. एका प्लेटमध्ये गरम जलेबी ठेवा. त्यावर थंडगार रबडी ओता. वरून काजू-बदाम-पिस्ता काप घालून सजवा.

## वास्तू

### गती येण्यासाठी

* घराच्या दक्षिण भिंतीवर सूर्योदयाच्या दिशेने धावणारे ७ पांढरे घोडे लावा.

* ईशान्य कोपऱ्यात छोटे फिश ॲक्वेरियम ठेवा. ९ सोनेरी व १ काळा मासा शुभ मानला जातो.

* मुलांनी अभ्यास करताना तोंड पूर्व किंवा उत्तर दिशेला करावे. पाठीमागे भिंत असावी, खिडकी नको.

* संध्याकाळी ७ नंतर घरात कापूर जाळा. वास्तुदोष व बाधा कमी होते.

## सौंदर्य

* कपड्यांमध्ये गोऱ्या वर्णासाठी मॅरून, रॉयल ब्लू, पाचू हिरवा उठून दिसतो. सावळ्या रंगाला मस्टर्ड, ऑलिव्ह ग्रीन, कोरल, ऑफ-व्हाइट खूप शोभतो. काळा रंग सगळ्यांनाच स्लिम दाखवतो.

## सल्ला

* गॅस वाया जावू नये यासाठी भाजी झाकण ठेवून मंद आचेवर शिजवा.

* पाणी उकळल्यावर गॅस बारीक करा. प्रेशर कुकरची रिंग वेळेवर बदला.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २८ मे २०२६

**प्रदोष, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ शुक्लपक्ष, चित्रा ०८।०९, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** धार्मिक कामात मन लागेल. घरात शुभ घटना घडेल. नशीब ९५% साथ देईल.

**वृषभ :** कामात चांगले बदल होतील. दिखावा टाळा. मन प्रसन्न राहील. योग करा.

**मिथुन :** करिअरला नवीन वळण मिळेल. अडथळे दूर होतील. प्रवास टाळा. रंग: नारंगी.

**कर्क :** व्यवसायासाठी दिवस चांगला. प्रेमजीवनात गोडवा येईल. आरोग्य उत्तम.

**सिंह :** धनलाभाचे योग. नोकरीतील वाद मिटतील. विष्णू पूजा करा.

**कन्या :** मेहनतीचं फळ मिळेल. गुंतवणूक फायद्याची ठरेल. दिवस शुभ.

**तूळ :** नाती सुधारतील. लग्नाचे प्रस्ताव येतील. सासरहून आर्थिक लाभ.

**वृश्चिक :** आध्यात्मिक ओढ वाढेल. मन शांत राहील. दिवस समाधानाचा.

**धनु :** आरोग्य उत्तम, ऊर्जा भरपूर. व्यायाम सुरू करण्यासाठी उत्तम दिवस. घरातून साथ मिळेल.


**मकर :** कुटुंबासोबत देवदर्शनाचा योग. सहल आनंददायी होईल. अचानक मोठे यश, बढती किंवा लाभ मिळेल. दिवस खास.

**कुंभ :** नशिबाची साथ. अचानक मोठं यश मिळेल. स्वप्न पूर्ण होतील.

**मीन :** कष्टानेच यश मिळेल. वाद, गैरसमज टाळा. आरोग्य जपा, प्रवास नको.

# शब्दगंध क्र. ७४३९

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) महाभारत कथेतील मगधचा राजा ज्याला भीमाने श्रीकृष्णाच्या इशाऱ्यानुसार ठार मारले ४) शिक्का; आंब्याच्या झाडाची मंजरी; छाप; अंकुर ६) प्रतिध्वनी ८) मागणीचा लकडा १०) औषध (हिंदी, उर्दू) ११) नटूनथटून गावभर हिंडणारा १३) गोंधळाची स्थिती; बेबंदशाही १४) गरज; आवश्यकता; जरुरी १५) गळ्याची मागची बाजू; आदर १६) पात्र; योग्य १८) मक्ता; खोती; पखवाजाच्या आवाजातील कालमापन १९) पदर; सोपा; ओसरी; साडीचा घोळ २०) पायधूळ

**उभे शब्द :-** १) विश्व; दुनिया; जग २) संपत्ती; धन ३) मुंडक्याविना शरीर; उघड; पुरतेपणी ४) अतिशय आनंद; हर्ष ५) आठवड्यातील सुट्टीचा दिवस ७) सावली; छाया ९) जनावरांना चरण्यासाठी राखून ठेवलेले गवताचे कुरण १०) पत्थर; धोंडा; पाषाण ११) नकला करणारा १२) शीख धर्माचे संस्थापक १३) ज्या दिवशी चंद्र अजिबात उगवत नाही अशा अंधारी रात्रीचा दिवस १७) कमर; कंबर; नितंब १८) ठोकर; अद्दल १९) तेज; चमक; तेजस्विता; पाणी

### शब्दगंध क्र. ७४३८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श | ■ | सु | म | न | ■ | आ | वा |
| र | ■ | ल | ग | ■ | ग | ज | र |
| म | हा | भा | र | त | ■ | ■ | क |
| ■ | ल | ■ | मि | न | त | वा | री |
| ■ | त | ला | ठी | ■ | ग | ण | ■ |
| पा | ■ | ग | ■ | फ | र | सा | ण |
| भ | र | व | सा | ■ | ■ | मा | ■ |
| र | ग | ड | ■ | अ | न | न | स |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** जगणं असेल तर वाघासारखं जगा, नाहीतर जंगलात हरणं शेकडो आहेत.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### समुद्राचे पाणी खारे पण नदीचे गोडे का?

निसर्गातील ही एक अद्भुत गोष्ट आहे की नद्या ज्या समुद्राला जाऊन मिळतात त्यांचे पाणी गोड असते, पण समुद्राचे पाणी मात्र खारट असते. या मागचे मुख्य कारण पाण्याचे चक्र आणि खडकांचे क्षरण हे आहे. जेव्हा पाऊस पडतो तेव्हा त्याचे पाणी पूर्णपणे शुद्ध व गोडे असते. मात्र हे पाणी जमिनीवर पडल्यानंतर डोंगर, खडक व मातीवरून वाहू लागते. पावसाचे पाणी हवेतील कार्बन डायऑक्साइडमुळे किंचित आम्लधर्मी बनलेले असते. हे आम्लधर्मी पाणी खडकांवरून वाहताना त्यातील सोडियम, मॅग्नेशियम, कॅल्शियम यांसारखी खनिजे व क्षार विरघळवून घेते. नद्या हे क्षारयुक्त पाणी सोबत घेऊन शेवटी समुद्राला जाऊन मिळतात.

नदीच्या पाण्यात हे क्षारांचे प्रमाण इतके अल्प असते की आपल्या जिभेला ते जाणवत नाही, त्यामुळे नदीचे पाणी आपल्याला गोड लागते. शिवाय नदी सतत वाहती असते. तिच्यात नवीन गोडे पाणी येत राहते आणि जुने पाणी पुढे सरकत राहते, त्यामुळे क्षार साठून राहण्याचा प्रश्नच येत नाही.याउलट समुद्र ही एक प्रचंड मोठी बंदिस्त जागा आहे. समुद्राच्या पृष्ठभागावरून सूर्याच्या उष्णतेमुळे दररोज लाखो लिटर पाण्याचे बाष्पीभवन होते.

मात्र पाण्याची वाफ होताना त्यातील मीठ व इतर क्षार मात्र तिथेच मागे राहतात, कारण क्षारांचे बाष्पीभवन होत नाही. जे गोडे पाणी वाफ होऊन वर जाते तेच पुन्हा ढग बनून पाऊस म्हणून जमिनीवर कोसळते आणि परत नवीन क्षार घेऊन समुद्रात येते. ही प्रक्रिया कोट्यवधी वर्षांपासून अव्याहतपणे सुरू आहे.

समुद्रातून हे क्षार बाहेर जाण्यासाठी कोणताही नैसर्गिक मार्ग नाही. त्यामुळे नद्यांनी आणलेले थोडे थोडे मीठ समुद्रात जमा होत गेले आणि हळूहळू समुद्राचे पाणी खारे बनले. याशिवाय समुद्राच्या तळाशी असलेल्या ज्वालामुखींमधून देखील अनेक प्रकारची खनिजे व क्षार थेट पाण्यात मिसळत असतात. म्हणूनच नद्या जरी समुद्राला मिळत असल्या तरी त्यांचे पाणी गोडे राहते, कारण त्या केवळ मीठ वाहून नेणाऱ्या वाहक आहेत. तर समुद्र हा त्या मिठाचा महासाठा आहे, जो अब्जावधी वर्षांपासून क्षार साठवत आहे. हेच खरे कारण आहे समुद्राच्या खारटपणामागे.

जर समुद्रातील सगळे मीठ काढून जमिनीवर पसरले तर संपूर्ण पृथ्वीवर १५० मीटर जाडीचा मिठाचा थर तयार होईल. काही बंदिस्त सरोवरे, जसे की राजस्थानचे सांबर सरोवर किंवा इस्रायलचा मृत समुद्र, यांना बाहेर वाहून जाण्यासाठी वाटच नाही. त्यामुळे तिथले पाणी समुद्रापेक्षाही ८ ते १० पट जास्त खारे आहे. गंमत म्हणजे नद्या जरी गोड्या असल्या तरी त्यांच्यामुळे दरवर्षी सुमारे ४ अब्ज टन मीठ समुद्रात जमा होते. आणि हो, व्हेलसारखे समुद्री प्राणी हेच खारे पाणी पिऊन जिवंत राहतात, कारण त्यांच्या शरीरात जास्तीचे मीठ बाहेर टाकण्याची खास यंत्रणा असते.

### सहकार्य

कासव आणि ससा यांची नवी शर्यतजुन्या शर्यतीत हरल्यामुळे ससा खूप लाजला होता. कासवाच्या धीराने आणि चिकाटीने त्याला पराभूत केले होते. पण ससा मान्य करायला तयार नव्हता. तो कासवाला म्हणाला, ती शर्यत मी झोपलो म्हणून हरलो. दम असेल तर पुन्हा लावूया शर्यत. कासव हसले आणि तयार झाले. पण यावेळी त्याने अट घातली, आपण शर्यत डोंगरावरून वाहणाऱ्या नदीच्या पलीकडच्या टोकापर्यंत लावूया. सशाने लगेच हो म्हटले. त्याला वाटले, मी वेगवान आहे, नक्की जिंकेन.

शर्यत सुरू झाली. ससा वाऱ्यासारखा पळाला. थोड्याच वेळात तो नदीकाठी पोहोचला. पण पुढे जाणार कसा? त्याला पोहता येत नव्हते. तो काठावर अस्वस्थ फेऱ्या मारू लागला. इतक्यात कासव हळूहळू तिथे पोहोचले. त्याने सशाची अवस्था पाहिली आणि म्हणाले, काळजी करू नकोस. माझ्या पाठीवर बस. कासव पाण्यात शिरले आणि सशाला पाठीवर घेऊन पैलतीराला गेले. नदी पार केल्यावर दोघेही धावत सुटले आणि एकाच वेळी अंतिम रेषेवर पोहोचले. शर्यत बरोबरीत सुटली. सगळे प्राणी टाळ्या वाजवू लागले.


ससा म्हणाला, मी वेगवान असलो तरी माझ्यात उणीव होती. तुझ्या मदतीशिवाय मी जिंकूच शकलो नसतो. कासव म्हणाले, प्रत्येकात वेगळा गुण असतो. एकमेकांच्या मदतीने आपण अशक्यही शक्य करू शकतो.

प्रत्येकाची ताकद वेगळी असते. एकमेकांच्या कमतरता भरून काढल्या तर सगळेच जिंकतात. अहंकारापेक्षा टीमवर्क नेहमी मोठे असते. त्या दिवसानंतर ससा आणि कासव चांगले मित्र बनले. पण जंगलातले इतर प्राणी म्हणाले, बरोबरीत सुटलेली शर्यत कसली? खरी जिंकणारी टीम कोण हे कळलेच नाही. तेव्हा कोल्ह्याने शक्कल लढवली, एक तिसरी आणि शेवटची शर्यत लावा. यावेळी रस्ता तुम्हीच ठरवा, पण एकत्र जायचे. ससा आणि कासवाने विचार केला. त्यांनी ठरवले की आधी जमिनीवर ससा कासवाला पाठीवर घेईल आणि नदी आल्यावर कासव सशाला पाठीवर घेईल. शर्यतीच्या दिवशी तसेच झाले. सपाट रस्त्यावर सशाने कासवाला पाठीवर घेतले आणि तो सुसाट पळाला. वाटेत मोठी नदी आली तेव्हा कासवाने सशाला पाठीवर घेतले आणि पोहून पैलतीर गाठला. पुढे पुन्हा ससा पळाला. दोघांनी मिळून आधीच्या सगळ्या वेळेचे रेकॉर्ड मोडले. सगळे प्राणी थक्क झाले.

सिंह राजा म्हणाला, हाच खरा विजय. स्वतःच्या ताकदीचा वापर आणि दुसऱ्याच्या मर्यादेचा आदर केला की दोघेही जिंकतात. त्या दिवसापासून जंगलात वेग विरुद्ध चिकाटी हे भांडण संपले आणि वेग + चिकाटी = यश हा नवा मंत्र सुरू झाला.

तात्पर्य : परिस्थितीनुसार आपली भूमिका बदलली आणि एकमेकांच्या गुणांचा योग्य वापर केला तर कोणतीही अडचण मोठी नसते. एकट्याने धावण्यापेक्षा सोबत चालले केव्हाही चांगले.

## जीवन का अमृत (भाग १)



बातें हैं और संतुलित बने रहने से, आपको असाधारण शक्ति और सहनशीलता का वरदान मिलेगा।

७५. समर्थ सत्गुरु का हर शिष्य समय आने पर अपने सच्चे शाश्वत घर पहुँचेगा। इसकी गति तेज हो जाती हैं, अगर शिष्य सत्गुरु का कहा माने । ऐसा करने से, तरक्की बहुत अधिक होती है। जब एक नामलेवा सचखंड पहुँचता है, तो वह हर कामना और लालसा से मुक्त हो जाता है। और पूर्ण परमानंद की हालत में होता हैं। किसी को सत्गुरु का कार्य सौंपा जाना प्रभु पर निर्भर करता हैं।

✻✻✻

### इंसानी आत्मा

७६. सच यह है कि प्रभु परम-आत्मा है और आत्मा द्वारा ही उसकी पूजा हो सकती है। हम उसकी पूजा न तो इंसानी हाथों से कर सकते हैं, न ही इंसानी हाथों से बनाए गए मंदिरों गिरजों में। वह इंसान की आत्मा की गहराइयों में बसता हैं। वह हर रूप में बसता हैं, और सभी आकृतियाँ, अपना रंग और रूप केवल उसी से पाते हैं। चाहे हम प्रभु में विश्वास करें या ना करें, हम वास्तव में उसी में बस रहें हैं और वही हमारा जीवन आधार है

✻✻

७७. भविष्य वाणियाँ केवल गणनाएँ हैं, जो कि इंसानी बुद्धि की समझ तक सीमित हैं, जबकि ईश्वरीय योजना किसी भी भौतिक नियम पर आधारित नहीं है।

७८. सत्संग में बैठकर जब हम शब्द की कमाई करते हैं, तो मन धीरे-धीरे निर्मल होने लगता है। जैसे मैला कपड़ा साबुन से साफ होता है, वैसे ही आत्मा पर जमी कर्मों की मैल भजन-सिमरन से धुलती है।

७९. दुनियादारी के काम करते हुए भी अगर सुरत शब्द से जुड़ी रहे, तो हर कार्य में बरकत और शांति मिलती है। निंदा-चुगली से बचो, क्योंकि ये मन को नीचे गिराती हैं और रूहानी तरक्की रोक देती हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### स्वत:च्या आत्म्याशी बोलणे

सुरेश ओबेरॉय : मी इथला वरिष्ठ आहे, ते माझ्याशी असे कसे वागू शकतात? शिवानीदीदी : जसा विचार तुम्ही निर्माण करता तशा भावना तयार होतात. ह्या परिस्थितीत, मी कोण आहे? या प्रश्नाला तुमचा प्रतिसाद - मी वडील आहे, मी सासरा आहे, मी कुटुंबप्रमुख आहे, असा होता. सुरेश ओबेरॉय : पण हे सगळं 'मी' आहे. शिवानीदीदी : जर तुम्ही वडील आहात, तर तुमच्या मुलाने तुमच्याशी कसं बोललं पाहिजे? सुरेश ओबेरॉय : आदरपूर्वक. शिवानीदीदी : मुलाने वडिलांशी आदरपूर्वक वागलं पाहिजे असा विचार करण्यासाठी तुम्ही तुमच्या मनाला प्रोग्रॅम केलं आहे. सुरेश ओबेरॉय : हे असं असू नये का? शिवानीदीदी : पद, भूमिका आणि नात्याप्रति आदर दाखवणं आपल्याला हवं आहे. ज्या क्षणी दुसरी व्यक्ती अनपेक्षित प्रतिसाद देते किंवा एखादी गोष्ट बरोबर असण्याच्या आपल्या व्याख्येला साजेसं वागत नाही तेव्हा आपलं मन दुखावतं. मन दुखावण्यामागे कोणता विचार दडलेला असतो? मन दुखावणं एक भावना आहे जी कोणत्याही विचाराशिवाय निर्माण करता येत नाही. ह्या भावनेमागे, 'मी मोठा आहे' किंवा 'मी त्यांच्यासाठी इतकं केलं आणि ते माझ्याशी असं वागले,' हा विचार आहे. ह्या विचारामागे, तुम्ही वडील आहात किंवा मोठे आहात याची जाणीव आहे. आता तुमची जाणीव बदला आणि असं समजा, 'मी एक आत्मा आहे.' आता तुम्ही समोरच्या व्यक्तीकडे कसं बघाल? सुरेश ओबेरॉय : एक आत्मा म्हणून.

शिवानीदीदी : त्या आत्म्याकडून ज्या प्रकारच्या बोलण्याची अपेक्षा तुम्ही ठेवली होती तसं तो बोलला नाही तर तुमच्या मनात कोणते विचार निर्माण होतील? विचार बदलेतील. सुरेश ओबेरॉय : पण समोरचा माझ्याशी 'सोल-टु-सोल' बोलू शकत नाही. त्याला वाटतं की तो त्याच्या वडिलांशी बोलत आहे. हे फक्त मलाच माहीत आहे की मी एका आत्म्याशी बोलत आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मास्तर: पिंट्या, सांग बरं गांधीजी कुठे जन्मले?

पिंट्या : गुगलवर सर!

मास्तर : अरे गाढवा, म्हणजे ठिकाण विचारतोय.

पिंट्या : तेच तर, गुगलवर पोरबंदर दाखवतंय.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ जगातील सर्वात मोठा लोकशाही देश कोणता?

– भारत

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### कोहळा

२) मज्जासंस्थेची कार्यशक्ती वाढविण्यासाठी कोहळ्याचा आहारात वापर करावा. कोहळा सूप किंवा रस प्यायल्याने मेंदूचा थकवा जाऊन उत्साह वाढतो. ३) कोहळ्यामध्ये तंतुमय पदार्थ व आर्द्रता भरपूर असल्याने मलावष्टंभाची तक्रार असलेल्यांनी कोहळ्याची भाजी खावी. यामुळे शौचास साफ होते.

४) मूळव्याधीचा त्रास होत असेल व शौचाच्या वेळी रक्त पडत असेल, तर कोहळा आवर्जून खावा.

५) कोहळा हा शुक्रवर्धक असल्याने व धातुदौर्बल्य दूर करून धातूंचे पोषण करणारा असल्यामुळे वंध्यत्व असणाऱ्या रुग्णांनी कोहळ्याचा रस साखर घालून प्यावा.

६) गर्भवती स्त्रीने तिचे व बाळाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी गर्भावस्थेत आवर्जून कोहळा खावा. ७) हृदयविकार असणाऱ्यांनी हृदयाचे बळ वाढविण्यासाठी कोहळा रस किंवा कोहळा सूप प्यावे.

८) नाकातून रक्त येणे या विकारात कोहळ्याचा रस प्यावा. कारण कोहळा हा रक्तपित्तशामक असल्याने लगेचच आराम मिळतो.

९) कृश व्यक्तींनी धातुदौर्बल्य कमी होऊन शरीराचे पोषण होण्यासाठी व वजन वाढविण्यासाठी कोहळ्यापासून बनविलेला कोहळे पाक नियमित खावा.

१०) गर्भवती स्त्रीने कोहळ्यापासून बनविलेला कुष्मांडावलेह या अवलेहाचे नियमितपणे सेवन करावे. यामुळे गर्भस्थ बाळाचे व मातेचे पोषण व्यवस्थित होते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००




नवीन टिळक रोडवरील माऊली सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याच्या शुभारंभ प्रसंगी महापौर सौ.ज्योतीताई गाडे, जि.प.च्या माजी अध्यक्षा सौ.शालिनीताई विखे यांच्या हस्ते राधा-कृष्ण विग्रह पूजन आणि दिपप्रज्वलन करण्यात आले. शेजारील छायाचित्रात उपस्थित असलेले भाविक.

# परिवारातील आप्तजनांपेक्षा मोबाईल प्रिय झाल्याने जीवनामधील दुःख वाढत चालले : रेवतीनंदन दास

## इस्कॉनच्या श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचा शुभारंभ

नगर - परिवारातील आप्तजनांपेक्षा मोबाईल अधिक प्रिय झाल्याने जीवनातील दुःख वाढत चालले, असे प्रतिपादन पुणे येथील इस्कॉन मंदिराचे ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास यांनी केले.

येथील नवीन टिळक रोडवरील माऊली सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.

महापौर सौ.ज्योतीताई गाडे, जि.प.च्या माजी अध्यक्षा सौ.शालिनीताई विखे यांच्या हस्ते राधा-कृष्ण विग्रह पूजन आणि दिपप्रज्वलन करण्यात आले. सौ.गाडे यांचा सन्मान डॉ. अंजली फाटके यांच्या हस्ते तर सौ.विखे यांचा सन्मान कमलिनीदेवी दास यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक गिरीवरधारी दास, नेवासाचे माजी आमदार संभाजीराव फाटके, अण्णासाहेब फाटके, वैष्णवतोष्णी दास, डॉ.सतीश फाटके आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. गिरीवरधारी दास यांनी उपस्थित श्रोतृवृंदाचे स्वागत करून डॉ. सतीश फाटके यांच्या विशेष पुढाकाराने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देऊन कथा निरूपण करणारे श्रीमान रेवतीनंदन दास यांचा परिचय करून दिला. सौ.शालिनीताई विखे आणि सौ.ज्योतीताई गाडे यांनी अधिक महिन्यात इस्कॉनने आयोजित केलेल्या या सोहळ्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

श्रीमान रेवतीनंदन दास पुढे म्हणाले, भगवान श्रीकृष्णाच्या गुणांचे वर्णन असलेल्या भागवताच्या श्रवणाने वैकुंठ प्राप्ती होते. अधिक महिना भगवंताला प्रिय आहे. या महिन्यात केलेल्या भक्तीचे फळ हजारोपट अधिक मिळते. स्कंद आणि पद्म पुराण भागवताचे गुणगान करतात. आपल्या मुखाने आपलेच गुणगान करू नये तसेच आपण धर्मकार्य करतो हे दुसऱ्यांना कधीही सांगू नये, हे भागवत शिकवते.

कलीयुगात वृत्ती आसुरी होत चालली आहे. मोबाईल आपल्या जीवनात मोठे नुकसान करतो आहे, हे कळत असूनही जेवताना सुध्दा मोबाईलमध्ये व्यस्त रहाण्यात धन्यता मानली जाऊ लागली आहे.

जन्मोजन्मीच्या पुण्याईनेच श्रीमद् भागवत कथा श्रवण करण्याचे भाग्य लाभते. सत्ता, संपत्ती, पद, प्रतिष्ठा, मान-सन्मान, घमेंडीवृत्ती हे सोडून भगवंताच्या जवळ गेलो तरच भगवंत समजून घेता येते. भगवंताची कथा श्रवण करण्याचे सौभाग्य प्राप्त होते. भक्ती, ज्ञान, वैराग्य पुष्ट झाले की, विवेक येतो.

आत्महत्या करून समस्या सुटत नसतात उलट आणखी दुःखाचा सामना करावा लागतो. १८ हजार श्लोकांचा भागवत ग्रंथ जीवनातील शाश्वत समाधान मिळवून देतो, असा ठाम विश्वास श्रीमान रेवतीनंदन दास यांनी व्यक्त केला.

सुमधूर संगीत आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या गीतांची साथ घेऊन सुरू झालेला हा सोहळा भाविकांना अधिक महिन्यातील ईश्वरी कार्याचा आनंद मिळवून देणारा ठरणार, हे पहिल्या दिवशीच्या अलोट गर्दीने दाखवून दिले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## चित्त शुद्ध ठेवण्यातच हित

“मुसाफिर”

संकलन: दिशान फिचर्स




वाईट स्वप्ने पडतात. खूप लोक त्यामुळे त्रस्त असतात. वाईट स्वप्नांचे अर्थ लावतात. आणखी चिंता करायला लागतात. दिवसा दुसऱ्याचे वाईट चिंतिले, ते रात्री स्वतःलाच बाधल्याचे दिसले. मग झोपेचे सुख संपले. डोळे. उघडेच ठेवले. झोप उडाली हेच बरे झाले. एरव्ही स्वप्नात तर मरणच ओढविले होते. स्वप्नात कुठला तरी राक्षस, त्याने धारदार शस्त्र गळ्यावर का हो धरले ? डोळे नसते उघडले, तर शस्त्र फिरले असते गळ्यावर.

आपणच आपल्या झोपेचे वैरी. मग कोण होणार तुमचे कैवारी? घालतात मग त्याचा भार देवावरी. अशी भयंकर वाईट स्वप्ने पडू नयेत म्हणून झोपताना म्हणावयाचा एक मंत्र ऋग्वेदात सांगितला आहे.

दिवसभर दुसऱ्याचे वाईट चिंतिले. दुसऱ्याला शिव्याशाप मोजले. दुसऱ्याचा विनाश करण्याचे नाना प्रकार मनाशी योजले. मग ते जागेपणी केलेले दुष्ट विचार रात्री मलाच भोवले. माझेच वाईट होताना दिसले. माझाच सर्वस्वनाश होताना मी पाहिला. कुणीतरी दुष्ट विचारांचा आक्रळविक्राळ माणूस माझ्या छातीवर बसला. माझा गळा दाबायला निघाला. मी अगतिक झालो.. ओरडायचे लाख प्रयत्न केले, पण वाया गेले. तोंडातून आवाज निघेना. आता कुणाला माझे संकट कसे कळेल, ते समजेना. दरदरून घाम फुटला. हे अग्निदेवा, माझी असली वाईट अवस्था होऊ देऊ नको. माझ्या मनात दिवसभर दुसऱ्याबद्दल वाईट विचार येतात, ते दूर घालव, पुन्हा तसे घाणेरडे विचार मनाला शिवणार देखील नाहीत, यासाठी माझे मन स्वच्छ ठेव. नको वाईट विचार, नको दुष्ट आचार, येऊ देत सर्व बाजूंनी माझ्याकडे सुविचार.

हा जो स्वप्नात भोवणारा दोष, तो मनातल्या पापांचाच कोश.

मनात इतरांबद्दल सूडभावना दडून बसते. मनाची ती एक विकृतीच बनते. मग कुठली झोप येते?

म्हणून मनात नेहमी चांगले विचार आणावेत. ते कृतीत उतरावेत. मनात वाईट विचार, मग ते तसेच फळणार. तुम्हाला भोवणार. चांगले सर्वांचे चिंतिले तर मनाला स्वस्थपणा लाभेल. मग झोपेचे सोने होईल. म्हणून तुकोबा म्हणतात, चित्त शुद्ध ठेवा. त्यातच तुमचे हित.

देवदत्त आताशा डाव्याच हाताने जेवायचा. उजव्या हातातला घास अर्ध्यावर आला की, घाबरायचा आणि पटकन डाव्या हाती घेऊन तोंडात घालायचा. सवय उजव्या हाताची, तरी ही डाव्याची लुडबुड चालायची. लोकांना हसायला संधी मिळायची.

हे रे काय? देवदत्ताला लोक विचारायचे. पण देवदत्ता लाज. लोकांना कसे सांगायचे? कारण एकदा त्याने अविचार केला. त्याच्या शत्रूला झोपून ठेवायला मिठाईतून अडूची गोळी घालायचा विचार केला. मिठाई आणली देखील. अफूची गोळी त्यात मिसळली देखील. पण रात्रभर झोपू शकला नाही. वाईट स्वप्न पडायचे की कुणी दुष्ट विष कालवलेले अन्न तोंडात भरवतोय. उजव्या हाताने, जबरदस्तीने, झोपेत त्याला ओरडता येत नाही. झोपेत तोंड बंद करायला बळ नाही. एकदाचा कसाबसा जागा झाला, पण डोळ्यांपुढून ते दृश्य जाईना. दिवसाही तेच दिसे. आतादेखील दिवसाढवळ्या जेवताना उजव्या हातात घास घेतला की तो विषानेच माखला, असे डोळ्यांपुढे दिसते. मग उजव्याचे डावे होते. - **किशोर गांधी**

# मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचा पटावर चाल देऊन शुभारंभ

## रशियन ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव यांचे आकर्षण

नगर - शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ उत्साहात झाला. रशियन ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव आणि अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, स्टेशन रोड येथे आयोजित या स्पर्धेला देशभरातील बुद्धिबळपटू, पालक आणि बुद्धिबळप्रेमींची मोठी उपस्थिती लाभली होती. या स्पर्धेत देशाच्या विविध राज्यातून २७५ पेक्षा अधिक खेळाडू सहभागी आहेत. या स्पर्धेत १४० आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी आहेत. यावेळी संघटनेचे सचिव यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, पारूनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी आदी उपस्थित होते.

स्पर्धेबाबत माहिती देताना अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, देशभरातील नामांकित बुद्धिबळपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला असून गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, महाराष्ट्र आदी राज्यांतील पेक्षा २७० अधिक खेळाडूंनी सहभाग निश्चित केला आहे. अवघ्या साडेपाच वर्षांच्या बाल बुद्धिबळपटूपासून ते ९२ वर्षीय ज्येष्ठ खेळाडूपर्यंत विविध वयोगटातील स्पर्धक आपल्या बुद्धीचे कौशल्य पणाला लावणार असुन ते पुढे म्हणाले, अहिल्यानगरमध्ये प्रथमच इतक्या मोठ्या स्तरावरील फिडे रेटिंग स्पर्धा होत आहे. बुद्धिबळाचा प्रसार आणि प्रचार वाढवण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून शंभर चेस बोर्ड खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आमचा उद्देश केवळ स्पर्धा घेणे नसून उत्कृष्ट खेळाडू घडवणे हा आहे. यंदा रशियन ग्रँड मास्टर यांना बोलावून विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले असून त्याचा खेळाडूंना मोठा फायदा होणार असल्याची भावना व्यक्त केली.




संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी प्रास्ताविकात सांगितले की, या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण म्हणजे रशियन ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव यांचा सहभाग होय. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेचा दर्जा अधिक उंचावला आहे. विशेष म्हणजे त्यांनी एकाचवेळी ३० खेळाडूंविरुद्ध प्रदर्शनीय सामना खेळून उपस्थितांची मने जिंकली. ते पुढे म्हणाले की, ही स्पर्धा पाच दिवस चालणार असून हा कार्यक्रम आम्ही लग्नसोहळ्यासारखा आनंदाने साजरा करतो. लवकरच नरेंद्र फिरोदिया चषक' बिलो १७००' स्पर्धाही आयोजित करण्यात येणार आहे. खेळाडूंसाठी सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे. या स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून प्रवीण ठाकरे, पवन राठी, शिरीष इंदुरकर, शार्दुल तपासे, अमरीश जोशी, देवेंद्र ढोकळे, प्रशांत धंगेकर, विशाल गुजराती काम पाहणार आहेत.

विशेष बाब म्हणजे या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे १०० लाकडी बुद्धिबळ पट आणि सोंगट्यांचा वापर महाराष्ट्रात प्रथमच करण्यात येत आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संघटनेचे खजिनदार सुबोध ठोंबरे, सदस्य पारूनाथ ढोकळे, शाम कांबळे, प्रशांत धंगेकर, देवेंद्र ढोकळे, मनीष जस्वानी, प्रकाश गुजराती, चेतन कड, विशाल गुजराती संजय खडके, नवनीत कोठारी, डॉ. स्मिता वाघ, अनुराधा बापट, सौ. शुभदा ठोंबरे, सौ. रोहिणी आडकर, दत्ता घाडगे, स्वप्नील भगुरकर आदी परिश्रम घेत आहेत.

स्पर्धेचे सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले. खजिनदार सुबोध ठोंबरे यांनी आभार मानले.

# आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने 'अंतर्ज्ञान प्रक्रिया' शिबिराचे आयोजन




नगर - आर्ट ऑफ लिव्हिंग, अहिल्यानगरच्या वतीने विद्यार्थ्यांच्या मानसिक, बौद्धिक आणि अंतर्ज्ञान विकासासाठी इंट्यूशन प्रोसेस या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २९ मे ते १४ जून या कालावधीत होणाऱ्या या शिबिरात ८ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार असून, जास्तीत जास्त पालकांनी आपल्या पाल्यांना या उपक्रमात सहभागी करण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धात्मक युगात मुलांमध्ये आत्मविश्वास, एकाग्रता आणि योग्य निर्णयक्षमता विकसित होणे आवश्यक बनले आहे. याच उद्देशाने आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून इंट्यूशन प्रोसेस हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या शिबिरामध्ये मुलांच्या सुप्त अंतर्ज्ञान शक्ती जागृत करण्यासाठी विविध तंत्रांचा उपयोग केला जाणार आहे.

संस्थेच्या वतीने सांगण्यात आले की, प्रत्येक मुलामध्ये नैसर्गिकरित्या अंतर्ज्ञानी क्षमता असते. योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाद्वारे ही क्षमता अधिक प्रभावीपणे विकसित करता येते. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांना सहावे इंद्रिय विकसित करणे, फोटोग्राफिक मेमरी वाढविणे, अभ्यासातील एकाग्रता सुधारणे, अज्ञात भीती कमी करणे, आत्मविश्वास वाढविणे, ध्या ज्ञानेद्रिये क्षमता वाढणे तसेच सर्जनशील विचारशक्ती विकसित होऊन अभ्यासात सुधारणा तसेच चांगल्या सवयी लागतात, कार्यक्रम नंतर दररोज मुलांची ऑनलाईन प्रॅक्टिस घेतली जाते, तसेच साप्ताहिक उजळणी देखील घेतली जाते.

यापूर्वी आर्ट ऑफ लिव्हिंगचे अहिल्यानगर केंद्र गावडे मळा आणि मिस्किन मळा, सावेडी येथे आयोजन झालेले आहे, पालकांच्या आग्रहास्तव आता शहराच्या मध्यवर्ती या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

यापूर्वी उपक्रमाला विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. असंख्य विद्यार्थ्यांनी या शिबिरामध्ये सहभाग घेतला होता. शिबिरानंतर अनेक पालकांनी मुलांमध्ये सकारात्मक बदल झाल्याचे अनुभव व्यक्त केले होते. या शिबिरासाठी दोन स्वतंत्र गट निश्चित करण्यात आले आहेत. IP Kids या गटामध्ये ८ ते १३ वर्षे वयोगटातील मुलांचा समावेश असून त्यांचे सत्र सायंकाळी ४ ते ६ या वेळेत होणार आहे. तर IP Teens या गटामध्ये १३ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांचा समावेश असून त्यांचे सत्र सायंकाळी ६ ते ८ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे.

हे शिबिर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी ऋग्वेद भवन, चौपाटी कारंजा जवळ, चितळे रोड, अहिल्यानगर येथे होणार असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. शहरातील पालकांनी याचा लाभ घेऊन आपल्या मुलांची नाव नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

नाव नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी ९४२२२२०८७४ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# १० वी १२ वीतील गुणवंतांचा आनंदधाम येथे सत्कार

## डॉ.अशोककुमार पगारिया यांचे ३१ मे रोजी 'करिअरविषयी मार्गदर्शन'



नगर - ज्ञान हे यशस्वी जीवनाचे मूलभूत अधिष्ठान मानले जाते. १९ व्या शतकातील दिव्य विभूती राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी म सा यांनी आपल्या आयुष्यात त्याग आणि संयमासोबतच ज्ञानप्राप्तीला विशेष महत्त्व दिले होते. जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत त्यांनी ज्ञानयज्ञ अखंड प्रज्वलित ठेवला. त्याच पावन प्रेरणेतून आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म. सा., प्रबुद्ध विचारक श्री आदर्शऋषिजी म. सा. तसेच संस्कार दिवाकर श्री आलोकऋषिजी म सा यांच्या सान्निध्यात श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड आणि महावीर सेना यांच्या संयुक्त विद्यमाने १० वी व १२ वी परीक्षेत विशेष गुणवत्ता प्राप्त सकल जैन समाजातील अहिल्यानगर येथील विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात प्रोफेसर डॉ. अशोककुमार पगारिया विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. पगारिया हे पुणे येथील भगवान महावीर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष असून, ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स, दिल्ली या संस्थेचे माजी राष्ट्रीय महामंत्री तसेच वर्तमान सकल प्रांत जैन भवन योजना अध्यक्ष आहेत. याशिवाय ते अहिल्यानगर येथील आनंद नवकार परिवार ट्रस्टचे कार्याध्यक्ष असून चार्टर्ड अकाउंटंट म्हणूनही परिचित आहेत.

हा सत्कार व मार्गदर्शन समारंभ ३१ मे रोजी सकाळी ८.३० ते १०.३० या वेळेत आनंदधाम येथे होणार आहे. या कार्यक्रमास अहिल्यानगर शहरातील सकल जैन समाजातील विद्यार्थी, विद्यार्थीनी आणि पालकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड व महावीर सेना व श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.



पितळे कॉलनी परिसरात पाणी साचल्याने नगरसेवक बाबुशेठ नागरगोजे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि महापालिका प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. (छाया - लहू दळवी)

# रस्त्यावर पाणी साचल्याने नागरिकांची गैरसोय

## नगरसेवक बाबुशेठ नागरगोजे यांच्या तत्पर हस्तक्षेपाने तात्पुरता प्रश्न मार्गी

नगर - शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील पितळे कॉलनी परिसरात पावसाळ्यात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याची समस्या पुन्हा एकदा निर्माण झाली असून नागरिकांना दळणवळणाचा गंभीर त्रास सहन करावा लागला. पहिल्याच पावसात रस्त्यावर गुडघाभर पाणी साचल्याने काही घरांमध्ये पाणी शिरल्याचेही प्रकार घडले, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली.

दरवर्षी पावसाळ्यात या भागात हीच परिस्थिती निर्माण होत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असून वाहतूक पूर्णपणे ठप्प होण्याची स्थिती निर्माण होते. यावर्षीही पावसाच्या सुरुवातीलाच पितळे कॉलनीतील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून 'डोह'सदृश परिस्थिती निर्माण झाली होती. या प्रकाराची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी नगरसेवक बाबुशेठ नागरगोजे यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि महापालिका प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. त्यांच्या निर्देशानुसार महापालिका कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर साचलेले पाणी मशीनच्या सहाय्याने उपसून रस्ता वाहतुकीसाठी खुला केला.

नगरसेवक नागरगोजे यांच्या तत्परतेमुळे नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी हा प्रश्न दरवर्षी उद्भवत असल्याने यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. पावसाळ्यात होणारी ही गैरसोय थांबवण्यासाठी योग्य ड्रेनेज व्यवस्था आणि नियोजनबद्ध उपाययोजना करण्याची गरज स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

# जितो नॅशनल जॉब फेअर २०२६ ला देशभरातील युवा वर्गाचा प्रतिसाद

नगर - जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्यावतीने (जितो) रोजगार निर्मिती, युवक सक्षमीकरण आणि उद्योग क्षेत्राला सक्षम मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने २३ मे रोजी पॅन इंडिया जितो नॅशनल जॉब फेअर २०२६ चे आयोजन करण्यात आले. देशभरातील विविध जितो चॅप्टर्समध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला युवक, उद्योग समूह आणि कंपन्यांकडून प्रतिसाद लाभला.





जितो नॅशनल जॉब फेअर २०२६ ला देशभरातील युवा वर्गाचा प्रतिसाद मिळाला.

या राष्ट्रीय उपक्रमाचा एक भाग म्हणून जितो अहिल्यानगर चॅप्टरतर्फे २३ मे रोजी अहिल्यानगर येथे अर्थ ७ बँक्वेट, जीसीएम टॉवर्स येथे जॉब फेअरचे आयोजन करण्यात आले. या जॉब फेअरमध्ये मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, फायनान्स, बँकिंग, मार्केटिंग, प्रशासन, तांत्रिक क्षेत्र तसेच विविध उद्योग क्षेत्रांतील नामांकित कंपन्यांनी सहभाग घेत उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

## अहिल्यानगर येथे कंपन्यांमध्ये उमेदवारांना थेट नियुक्ती

अहिल्यानगर येथे आयोजित जॉब फेअरमध्ये १० पेक्षा अधिक कंपन्यांचा सहभाग असून ६५ पेक्षा अधिक उमेदवारांनी ऑनलाईन व ऑफलाईन नोंदणी केली. त्यापैकी १५ उमेदवारांची ऑन-द-स्पॉट शॉर्टलिस्टिंग करण्यात आली असून ३० पेक्षा अधिक उमेदवारांची पुढील निवड प्रक्रिया सुरू आहे. अहिल्यानगर येथील कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जितो अहिल्यानगर चॅप्टरचे चेअरमन आलोक मुनोत, चीफ सेक्रेटरी तुषार कर्नावट, जॉब्स कन्व्हेनर प्रशांत बोगावत तसेच युथ विंग चेअरमन चेतन भंडारी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

जितो जॉब्स हा जितोचा सतत कार्यरत असलेला रोजगार प्रकल्प असून, या माध्यमातून उमेदवारांना रोजगाराच्या संधी तसेच कंपन्यांना योग्य उमेदवार उपलब्ध करून देण्याचे कार्य सुरू असते. या राष्ट्रीय जॉब फेअरमुळे हजारो युवकांना उद्योग क्षेत्राशी थेट जोडले जाण्याची संधी प्राप्त झाली.

या उपक्रमाविषयी बोलताना जितो एपेक्सचे प्रेसिडेंट विजय भंडारी यांनी सांगितले की, जितो नॅशनल जॉब फेअर हा केवळ रोजगार मेळावा नसून युवकांना योग्य दिशा, आत्मविश्वास आणि संधी उपलब्ध करून देणारा राष्ट्रीय स्तरावरील प्रभावी उपक्रम आहे. उद्योग आणि उमेदवार यांच्यातील दरी कमी करून रोजगार निर्मितीला चालना देणे हेच या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. आजच्या युवकांना केवळ शिक्षण नव्हे तर योग्य संधीची गरज आहे आणि जितो त्या दिशेने सातत्याने कार्यरत आहे. जितो जॉब्स हा प्रकल्प भविष्यातही युवकांसाठी मोठे व्यासपीठ ठरणार आहे.

या जॉब फेअरमुळे युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या असून उद्योग क्षेत्र आणि उमेदवार यांच्यात सकारात्मक संवाद निर्माण झाला.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# 'एसा बेस्ट स्ट्रक्चर अ‍ॅवॉर्ड'ने निलेश कन्स्ट्रोटेकचा सन्मान

## चार पुरस्कारांसह उत्कृष्ट कामगिरी; अमित बिहाणी यांचा बेस्ट आर्किटेक्ट पुरस्कार प्रदान

नगर – आर्किटेक्ट इंजिनीअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा) तर्फे आयोजित 'बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड' सोहळ्यात अहिल्यानगर–मधील निलेश कन्स्ट्रोटेक फर्मचा विशेष सन्मान करण्यात आला. विविध विभागांमध्ये चार पुरस्कार पटकावत फर्मने उल्लेखनीय यश मिळवले असून, अमित बिहाणी यांना 'बेस्ट आर्किटेक्ट' पुरस्काराने गौरविण्यात आले.

या सोहळ्यात हार्टबीट मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल प्रोजेक्टला प्रथम क्रमांक, तर रामदेव रेसिडेन्सी स्कीमलाही प्रथम क्रमांक मिळाला. तसेच क्लाउड ९ रेसिडेन्शियल प्रोजेक्टला द्वितीय क्रमांक मिळाला. या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे निलेश कन्स्ट्रोटेकला एकूण चार पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.



आर्किटेक्ट इंजिनीअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा) तर्फे आयोजित 'बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड' सोहळ्यात अहिल्यानगरमधील निलेश कन्स्ट्रोटेक फर्मचा विशेष सन्मान करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

हा पुरस्कार सोहळा पुणे विभागाचे नगररचना संचालक जितेंद्र भोपळे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी त्यांनी गुणवत्तापूर्ण बांधकाम क्षेत्रातील अशा उपक्रमांचे कौतुक करत उद्योगाला नवी दिशा देणारे असे उपक्रम असल्याचे नमूद केले. कार्यक्रमास निलेश कन्स्ट्रोटेकचे संचालक एम. एम. बिहाणी, शरद झंवर, निलेश बिहाणी, दीपक नागोरी, अमित बिहाणी तसेच एसा असोसिएशनचे अध्यक्ष अभिजीत देवी, उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, सचिव भूषण पांडव, खजिनदार सुनील औटी, समन्वयक आदिनाथ दहिफळे, मनपा नगररचनाकार स्नेहल यादव उपस्थित होते. निलेश कन्स्ट्रोटेक ही अहिल्यानगरमधील बांधकाम क्षेत्रातील प्रतिष्ठित संस्था असून गेल्या ५० वर्षांपासून शहरात दर्जेदार प्रकल्प उभारण्याचे काम करत आहे. संस्थेने कोहिनूर क्लॉथ स्टोअर, साईदीप हॉस्पिटल, रायसोनी कॉलेज, साताळकर लोटस हॉस्पिटल, रामकृष्ण शाळा तसेच क्लाउड ९ सारखे अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प उभे करून शहराच्या विकासात मोलाचा वाटा उचलला आहे.



एसा आयोजित बेस्ट स्ट्रक्चर अ‍ॅवॉर्ड – २०२६ मध्ये आर्किटेक्ट मयुर कोठारी यांना तीन वेगवेगळ्या विभागात आर्किटेक्ट म्हणून अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले.

# तीन वेगवेगळ्या विभागात अ‍ॅवॉर्डने आर्किटेक्ट मयुर कोठारी सन्मानीत

नगर – एसा आयोजित बेस्ट स्ट्रक्चर अ‍ॅवॉर्ड – २०२६ मध्ये आर्किटेक्ट मयुर कोठारी यांना तीन वेगवेगळ्या विभागात आर्किटेक्ट म्हणून अ‍ॅवॉर्ड देऊन गौरविण्यात आले.



विभागमध्ये कमर्शियल बिल्डींग – पहिले बक्षीस हार्टबीट हॉस्पीटल., सोशल आणि गव्हर्मेंट – दुसरे बक्षीस 'सॉलिटेयर बाय – बडीसाजन'., अपार्टमेंट (५०० स्के.मी.वरील) – दुसरे बक्षीस क्लाउड नाइन.

आजपर्यंतच्या त्यांच्या कारकिर्दीत एक चांगले आर्किटेक्ट म्हणून अनेकदा अ‍ॅवॉर्ड प्राप्त झाले आहेत. आजपर्यंत नगर शहरामधील व बाहेरील, आर्किटेक्ट म्हणून उभारलेल्या स्ट्रक्चरमुळे, शहरातील व बाहेरील गावांचा कायापालट झालेला आहे.

शहरामध्ये व बाहेर आर्किटेक्ट म्हणून वेगवेगळे स्ट्रक्चर्स, मग ते अपार्टमेंट असो, हॉस्पीटल, कमर्शियल, एज्युकेशनल इन्स्टिट्युशन, बंगलोज, फार्म हाऊसेस, हॉटेल्स, मॉल्स, बिल्डींग असे अनेक स्ट्रक्चर्स त्यांनी उभारले आहेत व काम चालू आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्काराने दत्तात्रय आभाळे यांचा गौरव

नगर – ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थेच्या वतीने येथील शालेय शिक्षक दत्तात्रय पांडुरंग आभाळे यांना 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. नाशिक येथील वावरेनगर, कामटवाडे येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते आभाळे यांना पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमास रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी, नाशिक महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त नानासाहेब साळवे, राज्य प्रवक्ते डॉ. अविनाश शिंदे, नाशिक जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश गायकवाड, माजी स्थायी समिती सभापती संजय साबळे, सुधीर उमराळकर, संजय दोफ्लदे, रील स्टार आसावरी बर्वे तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठवले, सचिव मिलिंद कळवणकर आदी उपस्थित होते.



ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थेच्या वतीने येथील दत्तात्रय आभाळे यांना 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

संगमनेर तालुक्यातील नांदूर खंदरमाळ येथील भगवती माता विद्यालयात कार्यरत असलेले दत्तात्रय आभाळे यांनी आपल्या कार्यातून शिक्षण आणि समाजसेवेचा अनोखा संगम घडवून आणला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. आज शिक्षक म्हणून कार्यरत असताना ते विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव, नैतिक मूल्ये आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. ग्रामीण भागातील अनेक गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी शैक्षणिक मदत व मार्गदर्शन करून शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत.

शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यातही आभाळे यांचा सक्रिय सहभाग देत आहे. ग्रामीण युवकांमध्ये शिक्षणाबाबत जागृती निर्माण करणे, स्वच्छता अभियान राबविणे, पर्यावरण संवर्धन उपक्रमात सहभाग घेणे तसेच रक्तदान शिबिरांचे आयोजन अशा विविध सामाजिक उपक्रमांत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



अश्वत्थ डिझाईन स्टुडिओचे आर्किटेक्ट रोहित साळुंके आणि सोनू साळुंके यांना ऐसाच्या ऐसा बेस्ट स्ट्रक्चर अ‍ॅवॉर्ड २०२६ ने सन्मानित करताना आमदार संग्राम जगताप. समवेत नगरसेवक निखिल वारे आदी.

# अश्वत्थ डिझाईन स्टुडिओला ऐसा बेस्ट स्ट्रक्चर अ‍ॅवॉर्ड

नगर – येथील अश्वत्थ डिझाईन स्टुडिओचे आर्किटेक्ट रोहित साळुंके आणि सोनू साळुंके यांना ऐसाच्या नगरमधील कार्यक्रमात पुणे येथील चेलाराम हॉस्पिटलमधील लँडस्केप प्रोजेक्टसाठी ऐसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड २०२६ ने सन्मानित करण्यात आले. बेस्ट डिझाइन औटसाईड अहिल्यानगर सिटी या विभागात या प्रकल्पाला द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला.

या प्रकल्पामध्ये वेलनेस सेंटरच्या टेरेस लँडस्केपचे नियोजन व डिझाईन करण्यात आले असून, शांत व सकारात्मक वातावरण निर्मितीवर विशेष भर देण्यात आला होता. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी ऐसाचे अध्यक्ष अभिजित देवि, सचिव भूषण पांडव, इंजि. संजय चांदवले तसेच ऐसाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांची तत्परता; सापाला सुरक्षित पकडून निसर्गात मुक्त

नगर – भिंगार येथील गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये सकाळी व्यायामासाठी आलेल्या नागरिकां–मध्ये अचानक साप दिसल्याने काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी प्रसंगावधान राखत सापाला सुरक्षितपणे पकडून नैसर्गिक अधिवासात मुक्त केले. या घटनेमुळे पर्यावरण आणि वन्यजीव संवर्धनाबाबत सकारात्मक संदेश देण्यात आला.



भिंगार परिसरातील गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये दररोजप्रमाणे हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य सकाळी व्यायाम, योगा आणि आरोग्यविषयक उपक्रमांसाठी एकत्र आले होते. याच दरम्यान पार्क परिसरात अचानक साप दिसून आला. साप दिसताच काही नागरिक आणि व्यायामासाठी आलेले सदस्य घाबरून गेले. काही काळ परिसरात गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. मात्र, हरदिन ग्रुपचे सदस्य सुधीर कपाले यांनी धाडस आणि संयम दाखवत त्या सापाला कोणतीही इजा न होता सुरक्षितरीत्या पकडले. त्यांनी प्लास्टिकच्या बाटलीच्या साहाय्याने सापाला अलगद पकडून नियंत्रणात आणले. त्यानंतर ग्रुपच्या सदस्यांनी मिळून त्या सापाला जंगलमय आणि सुरक्षित नैसर्गिक परिसरात नेऊन पुन्हा मुक्त केले. या वेळी संजय सपकाळ, अशोकराव पराते, अविनाश जाधव यांच्यासह ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, हरदिन मॉर्निंग ग्रुप केवळ आरोग्य संवर्धनासाठी कार्य करत नाही, तर पर्यावरण आणि निसर्ग संवर्धनालाही तितकेच महत्त्व देतो. वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन यासोबतच पशु–पक्षी आणि वन्यजीवांच्या संरक्षणासाठीही ग्रुपचे सदस्य नेहमी जागरूक असतात. ते पुढे म्हणाले की, सध्या उन्हाळ्याच्या दिवसांत तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे सापांसारखे सरपटणारे प्राणी पाण्याच्या, ओलाव्याच्या आणि भक्ष्याच्या शोधात बिळांमधून बाहेर पडून मानवी वस्त्यांकडे वळतात. अशा वेळी भीतीपोटी अनेकदा नागरिक सापांना मारण्याचा प्रयत्न करतात. मात्र, साप हा पर्यावरण साखळीतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता तत्काळ सर्पमित्रांना संपर्क साधावा आणि त्या प्राण्याला सुरक्षितपणे पुन्हा निसर्गात सोडण्यासाठी सहकार्य करण्याचे त्यांनी सांगितले.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर महिला शहराध्यक्षपदी अर्चना गायकवाड यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर महिला शहराध्यक्षपदी अर्चना गायकवाड यांची निवड

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या अहिल्यानगर शहराध्यक्षपदी अर्चना गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. मुंबई येथील राष्ट्रवादी भवन येथे झालेल्या कार्यक्रमात ही घोषणा करण्यात आली. खासदार निलेश लंके यांच्या शिफारशीवरून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे तसेच महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्या उपस्थितीत निवडीची घोषणा करण्यात आली.

अर्चना गायकवाड यांच्या निवडीमुळे पक्षाच्या महिला संघटनात्मक बांधणीला बळ मिळणार असल्याची भावना पक्ष पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविल्याचे सांगण्यात आले.

यावेळी अर्चना गायकवाड यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी व्यापक उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले. अहिल्यानगर शहरात महिलांसाठी विविध कौशल्यविकास कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असून महिलांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच महिलांसाठी मार्गदर्शन शिबिरे, स्वयंरोजगार आणि व्यवसायविषयक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. युवतींसाठी नोकरी विषयक विशेष मार्गदर्शन, करिअर मेळावे आणि रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

या निवडीबद्दल आमदार रोहित पवार, आमदार जितेंद्र आव्हाड, जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे, प्रदेश उपाध्यक्ष हाजी शौकत तांबोळी, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अथर खान, जिल्हा कार्याध्यक्ष सीताराम काकडे, अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष समीर पठाण, शहराध्यक्ष आलतमश जरीवाला, युवक अध्यक्ष रोहन शेलार, मावळा ग्रुपचे चंद्रकांत उजागरे, सुशांत म्हस्के, नगरसेवक योगिराज गाडे, शिवसेनेचे प्रतीक बारसे, शहर कार्याध्यक्ष अझहर शेख, मनीषा चोंदे, छाया पाचर्णे, मनीषा भळगट, जिल्हा उपाध्यक्ष मतीन शेख, सेवादल जिल्हाध्यक्ष रवी धनवटे, नीलेश मालपाणी, फय्याज तांबोळी आर्दीनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# नगर जिल्ह्यात रक्ताचा भीषण तुटवडा असल्याने जनकल्याण केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी केले रक्तदान

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात रक्तपेढीमध्ये मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. मार्च, एप्रिल, मे हा तीव्र उन्हाळ्याचा महिना असल्याने या कालावधीमध्ये शिबिरे घेतली जात नसल्याने रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. आपण समाजाचे देणे लागतो. या उद्देशाने जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मिस्त्री यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन नालेगाव येथील जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने करण्यात आले होते. या शिबिरात जनकल्याण रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांनी उस्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.



जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने आयोजित शिबिरात रक्तदान करताना दाते.

या शिबिरात जनकल्याण रक्त केंद्राचे प्रशासकीय अधिकारी सागर उंडे, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी स्मिता बडवे, अकाउंट ऑफिसर गजेंद्र सोनवणे, डॉ.गौरी जोशी, डॉ. गुलशन गुप्ता, डॉ.वसंत झेंडे, डॉ. हर्ष शाह, जनसंपर्क अधिकारी शरद बळे, अमित टकले, मयूर खरमाळे, किरण शिंदे, गणेश तनपुरे, सचिन शेडाळे, गौरव पठाडे, वेदांत हरिश्चंद्रे, रवींद्र साबळे, राहुल पुंड, गौरव बागल, आशिष लिमकर, किशोर यादव, अनिता कराळे, सुलभा पवळ आदी उपस्थित होते.


जनकल्याण रक्तकेंद्राच्या आवाहनाला प्रतिसाद देत विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, निवृत्त पोलीस अधिकारी भास्कर टेमकर, अ‍ॅड. निनाद देव, रमाकांत दिघे, विजय चव्हाण आदींनी रक्तदान केले.

सागर उंडे म्हणाले, जिल्ह्यात सर्वत्र रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात असल्याने नागरिकांनी उस्फूर्तपणे रक्तदान करून रक्तदानाच्या महान कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा. रक्त हे मानवनिर्मित आहे. रक्त हे कोणत्याही फॅक्टरी तयार होत नसल्याने प्रत्येकाने सामाजिक दायित्व म्हणून रक्तदान करून समाजकार्य हातभार लावावा. असे आवाहन जनकल्याण रक्त केंद्राच्या वतीने करण्यात येत आहे. रक्त केंद्राने स्वेच्छा रक्तदात्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. रक्तदात्यांनी रक्तदान करून रक्ताची समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा.

# अ‍ॅग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंड अंतर्गत कृषी ड्रोनसाठी जिल्हा सहकारी बँकांमार्फत कर्जयोजना सुरु करावी

## प्रभाकरम फाउंडेशनचे कृषिमंत्र्यांना निवेदन

नगर – जिल्हा बँकांमार्फत अ‍ॅग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंड (एआयएफ) अंतर्गत कृषी ड्रोनसाठी विशेष कर्जयोजना सुरू करण्यात यावी, अशी मागणी प्रभाकरम फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली. या मागणीचे निवेदन फाऊंडेशनचे अध्यक्ष विपुल तापकीर व निखिल कवडे यांनी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन दिले. यावेळी कृषीमंत्री भरणे यांनी या मागणीबाबत सकारात्मक भूमिका दर्शविली.




जिल्हा बँकांमार्फत अ‍ॅग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंड अंतर्गत कृषी ड्रोनसाठी विशेष कर्जयोजना सुरू करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन प्रभाकरम फाउंडेशनच्या वतीने विपुल तापकीर व निखिल कवडे यांनी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे दिले.

कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना कमी खर्चात आणि अधिक कार्यक्षम पद्धतीने फवारणी सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी कृषी ड्रोनची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः युवक आणि ग्रामीण उद्योजकांना कृषी ड्रोन व्यवसायासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी सुलभ कर्जपुरवठा आवश्यक असल्याचे मत फाऊंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आले. कृषी ड्रोन क्षेत्राला चालना मिळाल्यास शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार होऊन उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# कॅलिडोस्कोप

## इंडोनेशियात दिसले रंगीबेरंगी ढग



इंद्रधनुष्य आकाशात दिसणे ही सामान्य गोष्ट असली तरी ढगच इंद्रधनुष्याच्या रंगांनी उजळून निघाल्याचे दृश्य पाहायला मिळाले तर तो अनुभव नक्कीच विलक्षण ठरतो. इंडोनेशियाच्या आकाशात अलीकडेच असेच रंगीबेरंगी ढग दिसून आले असून त्यांच्या छायाचित्रांनी 'सोशल मीडिया'वर मोठी चर्चा रंगली आहे.


निळ्याशार आकाशात दिसणाऱ्या या ढगांच्या कडांवर गुलाबी, जांभळा, हिरवा, पिवळा आणि निळा अशा विविध रंगांची चमक दिसत होती. त्यामुळे आकाशात एखाद्या चित्रकाराने रंगांची उधळण केल्यासारखे दृश्य निर्माण झाले होते. या दुर्मीळ नैसर्गिक घटनेला 'रेनबो क्लाउड' किंवा 'इरिडेसेंट क्लाउड' असे म्हटले जाते. वैज्ञानिकांच्या मते, सूर्यप्रकाश अतिशय सूक्ष्म पाण्याचे थेंब किंवा बर्फाच्या स्फटिकांमधून जातो, तेव्हा प्रकाशाचे विभाजन होते आणि ढगांवर विविध रंग उमटतात. विशेषतः पातळ ढग सूर्य किंवा चंद्राजवळ असतील, तर हा परिणाम अधिक स्पष्टपणे दिसून येतो. अनेकांनी याला 'निसर्गाचा जादुई चमत्कार' म्हटले आहे. काहींना हे दृश्य एखाद्या विज्ञान-काल्पनिक चित्रपटातील दृश्यासारखे वाटले, तर काहींनी सुरुवातीला हे फोटो एडिट केलेले असावेत अशी शंका व्यक्त केली. एका यूजरने प्रतिक्रिया देताना 'आकाशात जणू सूर्याने प्रिझम ठेवला आहे' असे म्हटले, तर दुसऱ्याने 'निसर्ग जेव्हा रंग दाखवतो, तेव्हा कलाकारांची गरजच पडत नाही' अशी प्रतिक्रिया दिली.

## डोळे हे जुलमी गडे

डोळे हा माणसाच्या शरीरातला अत्यंत महत्त्वाचा आणि नाजूक अवयव. दृष्टी नसेल तर सृष्टी पाहता येत नाही. परमेश्वराने माणसाच्या शरीराची रचना करताना प्रत्येक गोष्टीचा नीट विचार केला आहे. आपल्या सर्व अवयवांचं कार्य नित्यनेमाने सुरू असतं. डोळेही सातत्याने कार्यरत असतात. अशा या डोळ्यांबद्दलची रंजक माहिती जाणून घेऊया.



- डोळ्यांच्या विकासाची सुरूवात तब्बल ५५० दशलक्ष वर्षांपूर्वी झाल्याचं सांगितलं जातं. गर्भधारणा होऊन दोन आठवडे उलटल्यानंतर डोळ्यांचा विकास होऊ लागतो.
- भुवयांमुळे कपाळावरचा घाम डोळ्यात जात नाही तर पापण्यांमुळे धूळ आणि घाणीपासून या नाजूक अवयवाचं रक्षण होतं.
- डोळ्यांची रचना अनोख्या पद्धतीने करण्यात आली असून चेहऱ्यावरच्या खोबणीत ते बसवण्यात आले आहेत.
- जन्मापासून मृत्यूपर्यंत बुब्बुळांच्या आकारात कोणताही बदल होत नसला तरी नाक आणि कानांचा आकार मात्र बदलत राहतो.



- माणसाच्या डोळ्याचं वजन एक औंसापेक्षाही कमी असतं.
- डोळ्यांना झालेली जखम खूप लवकर बरी होते.
- दृष्टीशी संबंधित ८० टक्के दोष टाळता येतात किंवा पूर्णपणे बरे होतात.
- मेंदूनंतर डोळा हा शरीराचा सर्वात गुंतागुंतीचा अवयव आहे.
- जगभरातल्या ५५ टक्के लोकसंख्येच्या डोळ्यांचा र ंग भूरा आहे.
- जास्त वेळ वाचन केल्याने किंवा सातत्याने कॉम्प्युटर, स्मार्टफोनच्या स्क्रीनवर नजर खिळवल्याने डोळ्यांना थकवा येतो.

## ४० पुरुषांना केले सरळ!





शहरात महिलांच्या सुरक्षेची स्थिती नेमकी काय आहे हे जाणून घेण्यासाठी स्वत: महिला पोलस आयुक्त रस्त्यावर उतरल्या होत्या. हैदराबादमधील मलकाजगिरीच्या पोलस आयुक्त सुमती यांनी घेतलेला हा निर्णय धाडसी होता. रस्त्यांवर महिलांना भेडसावणाऱ्या सुरक्षेच्या आव्हानांची उकल करण्यासाठी त्या शहरातील रस्त्यावर मध्यरात्री एकट्या उभ्या होत्या. सुमती यांनी साधे कपडे घातले होते. तसंच त्यांच्या बाजूला पोलिसांचा कोणताही फौजफाटा नव्हता. रात्री साडेबारा ते पहाटे साडेतीन वाजेपर्यंत त्या बस स्टॉपवर बसून होत्या. दरम्यान यानंतर जे काही झालं ते धक्कादायक होतं. फक्त तीन तासात जवळपास ४० पुरुष त्यांच्याजवळ आले आणि विचारणा केली. यामधील अनेकजण दारुच्या नशेत होते. तसंच काहीजणांनी तर गांजाचं सेवन केलं होतं. त्यात तरुण, विद्यार्थी आणि नोकरदारांचा समावेश होता. या वेळी त्यांना आपण एका साध्या महिलेशी नाही, तर एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याशी बोलत आहोत याची पुसटशी कल्पनाही नव्हती. या मोहिमेचा उद्देश फक्त तक्रारी किंवा रिपोर्टवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष जमिनीवर नेमकी काय स्थिती आहे हे जाणून घेणं, हा होता. दरम्यान, या ऑपरेशननंतर संबंधित पुरुषांची ओळख पटवण्यात आली; मात्र त्यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल न करता पोलिसांनी त्यांना समुपदेशनासाठी बोलावले आणि सार्वजनिक ठिकाणी महिलांशी वागण्याबाबत त्यांना कडक ताकीद दिली. पोलिसांच्या या कृतीचं रहिवाशांकडून आणि खासकरुन महिलांकडून मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. पोलिस आयुक्त सुमती यांनी असं धाडस करण्याची ही पहिलीच वेळ नाही. सुमारे २५ वर्षांपूर्वी, काझीपेठ रेल्वे स्थानकाजवळ पोलिस उपअधीक्षक म्हणून आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी महिलांच्या सुरक्षेची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी अशाच प्रकारची एक मोहीम राबवली होती.


तेलंगणा केडरच्या वरिष्ठ आयपीएस अधिकारी असलेल्या सुमती यांनी यापूर्वी राज्य गुप्तचर विभागाच्या प्रमुख म्हणूनही काम पाहिले आहे. तसंच, मलकाजगिरीच्या पोलिस आयुक्तपदी नियुक्ती होण्यापूर्वी, देवूजी आणि इतरांच्या नेतृत्वाखालील अनेक प्रमुख माओवाद्यांना शरणागती पत्करण्यास लावण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

## ... पोलिसांनाच बोलवले मदतीला!

ओडिशामधील एका विचित्र चोरीच्या प्रकाराची सध्या 'सोशल मीडिया'वर जोरदार चर्चा सुरू आहे. चोरी करण्यासाठी घरात शिरलेले दोन चोर घरातच अडकले आणि अखेर पोलिसांनाच मदतीसाठी फोन करावा लागला. त्यामुळे या घटनेची तुलना अनेकजण विनोदी चित्रपटातील प्रसंगाशी करत आहेत.

ही घटना ओडिशातील बसंती कॉलनी परिसरातील असल्याचे सांगितले जात आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, दोन्ही आरोपी रात्री उशिरा एका दुमजली घरात चोरी करण्यासाठी शिरले होते. त्या वेळी घरमालक आणि भाडेकरू दोघेही बाहेर असल्याने त्यांनी घराचे कुलूप तोडून प्रवेश केला. घरात शिरल्यानंतर आरोपींनी कपाट फोडून सोन्या-चांदीचे दागिने काढले; मात्र याचदरम्यान शेजारी राहणाऱ्या एका वृद्ध व्यक्तीला घरातून संशयास्पद आवाज ऐकू आला. त्यांनी तात्काळ परिसरातील लोकांना बोलावले.

काही वेळातच मोठ्या संख्येने नागरिक घटनास्थळी जमा झाले. लोकांनी घराचे मुख्य दार आणि छताकडे जाणारा मार्ग बाहेरून बंद करून टाकला. त्यामुळे दोन्ही चोर घरातच अडकून पडले. बाहेर संतप्त जमाव जमा झाल्याने आरोपी घाबरले. बाहेर पडल्यास जमाव मारहाण करू शकतो, अशी भीती त्यांना वाटू लागली. अखेर त्यांनीच आपत्कालीन क्रमांक ११२ वर फोन करून पोलिसांकडे मदत मागितली.



## जुळ्या मुलींचं अजब रहस्य!



अनेकदा महिलांना जुळी बालके होतात. दोन्ही बाळामध्ये इतके साम्य असते, की त्यांच्यातील फरकही ओळखू येत नाही. आता ब्रिटनमधील नॉटिंगहममधून धक्कादायक बातमी समोर आली आहे. या भागात राहणाऱ्या, गेली पन्नास वर्षे स्वत:ला जुळ्या समजत असणाऱ्या दोन बहिणींना एका डीएनए चाचणीमुळे मोठा धक्का बसला. चाचणीनंतर त्यांना कळले, की त्या जुळ्या आहेत; पण त्यांचे जैविक वडील वेगवेगळे आहेत. म्हणजे एकाच वेळी जन्मलेल्या या दोघींची आई एकच आहे; मात्र बाप वेगवेगळे आहेत.

सुमारे पन्नास वर्षे मिशेल आणि लॅव्हिनिया ऑस्बॉर्न यांनी आयुष्यातील प्रत्येक क्षण एकत्र घालवला; मात्र त्यांच्या वडिलांबाबत त्यांना नेहमीच शंका होती. म्हणून त्यांनी डीएनए टेस्ट केली आणि धक्कादायक सत्य समोर आले. दोघींची आई एकच; पण वडील वेगवेगळे. या दुर्मिळ घटनेला वैद्यकीय भाषेत 'हेदरपॅटर्नल सुपरफ `क्युंडेशन' असे म्हणतात. एका मासिक पाळीच्या चक्रात महिलेमध्ये दोन अंडी तयार होतात आणि अतिशय कमी वेळेत दोन वेगवेगळ्या पुरुषांशी संबंध आल्यामुळे ती दोन्ही अंडी वेगवेगळ्या शुक्राणूंनी फलित होतात तेव्हा ही अवस्था तेव्हा होते. जगभरात अशी २४ पेक्षा कमी प्रकरणे नोंदवली गेली आहेत आणि ब्रिटनमध्ये हा पहिलाच प्रकार मानला जातो.


जुळ्या बहिणींच्या आईने जेम्स नावाची व्यक्ती त्यांचे वडील असल्याचे सांगितले होते; पण तो खूप कमी वेळा त्यांना भेटायचा. काही वर्षांनी मिशेलला जेम्सच्या फोटोशी स्वतःचे साम्य दिसले नाही. त्यामुळे तिला संशय आला आणि तिने डीएनए टेस्ट करण्याचा निर्णय घेतला. रिपोर्टमध्ये जेम्स नव्हे, तर ॲलेक्स नावाची व्यक्ती तिचे खरे वडील असल्याचे समोर आले. यामुळे सर्वांनाच धक्का बसला. जेव्हा ॲलेक्सचा डीएनए लॅव्हिनिया ऑस्बॉर्नसोबत जुळला नाही तेव्हा चिंता आणखी वाढली. शेवटी आर्थर नावाच्या व्यक्तीला लाविनियाचे जैविक वडील म्हणून ओळख मिळाली. आता त्यांच्यात चांगले नाते निर्माण झाले आहे. लाविनिया सांगते, तिला नेहमी काहीतरी वेगळं वाटायचं; पण आता तिला हवी होती ती शांती मिळाली आहे.

## स्टंटबाज ॲरॉन



व्हिलचेअरवर दिवस काढणाऱ्या व्यक्तींबद्दल आपल्याला सहानुभूती वाटते. अपंगत्वामुळे बऱ्याच जणांना आयुष्यभर व्हिलचेअर जवळ करावी लागते. पण या परिस्थितीचा फारसा बाऊ न करणारे लोकही असतात. ॲरॉन फोथरिंगम अशांपैकीच एक. तरुण मंडळी मोटरसायकलचे स्टंट करतात. ट्रेनच्या दारात उभे राहणारेही चर्चेत असतात. पण ॲरॉन व्हिलचेअरवर बसून स्टंट करतो. तो व्हिलचेअर ३६० अंशात अगदी सहजपणे फिरवतो. अशा कसरती दाखवून त्याने बऱ्याच स्पर्धांमध्ये विजेतेपदं पटकावली आहेत. या धाडसी मुलाचे कारनामे बघून आपण आश्चर्यचकित होतो. त्याचं कौतुक करण्यासाठी शब्दही अपुरे पडतात. ॲरॉनचा हा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरू शकतो. पाठीच्या कण्याशी संबंधित दोष घेऊन जन्माला आलेल्या ॲरॉनने जिद्दीने या अपंगत्त्वावर मात के ली. सुरूवातीला तो कुबड्या वापरत असे. त्याने वयाच्या आठव्या वर्षापासून व्हिलचेअर वापरायला सुरूवात केली. त्याचा भाऊ बीएमएक्सवर स्टंटबाजी करत असे. त्याच्याकडूनच ॲरॉनला प्रेरणा मिळाली. बीएमएक्स ट्रॅकचा वापर करायला सुरूवात केल्यानंतर त्याने कधीही मागे वळून पाहिलं नाही. त्याने स्टंटबाजीच्या बऱ्याच स्पर्धा गाजवल्या. तो रिॲलिटी शोमध्येही सहभागी झाला होता. त्याने एका मालिकेतही काम केलं. ॲरॉनच्या नावे बरेच विक्रम नोंदवले गेले आहेत.

## जमिनीखालचं गाव



जगभरात अनेक चित्रविचित्र ठिकाणं आहेत. त्यांच्याबद्दल जाणून घेतल्यावर आपले डोळे विस्फारतात. काही ठिकाणं निसर्गाचा चमत्कार असतात तर काही मानवनिर्मित. अमेरिकेतलं असंच एक गाव पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरलं आहे. ते जमिनीखाली वसलं आहे. आपण भुयारी रेल्वे, मेट्रोबद्दल ऐकून आहोत. परदेशात अशा रेल्वे कार्यरत आहेत. पण संपूर्ण गावच जमिनीच्या खाली असणं हा प्रकार भन्नाटच म्हटला पाहिजे. 'सुपाई' असं या जमिनीखालच्या गावाचं नाव! ते जमिनीपासून तब्बल तीन हजार फूट खोल वसलं आहे. जगभरातून दरवर्षी जवळपास ५५ लाख लोक 'सुपाई'ला भेट द्यायला येतात. लोकसंख्या खूप कमी असली तरी पर्यटकांमुळे ते कायम गजबजलेलं असतं. अमेरिकेतल्या 'ग्रँड कॅनियन' जवळच्या हवासू भागातल्या खोल दरीत 'सुपाई' वसलं आहे. या ठिकाणी अवघे २०८ लोक राहतात. अमेरिकेतले मूळ निवासी असणारे 'रेड इंडियन्स' इथले नागरिक आहेत. अमेरिकेसारख्या जागतिक महासत्ता असणाऱ्या देशातलं हे गाव आधुनिक सोयीसुविधांपासून मात्र वंचित आहे. इथे येण्यासाठी बरीच पायपीट करावी लागते किंवा खेचरावर बसून प्रवास करावा लागतो. इकडे एखाद-दुसरं विमानच येतं.

## नोकरी अट्टल चोरांसाठी



सध्याच्या काळात नोकरी मिळणं अत्यंत कठीण झालं आहे. भरतीची जाहिरात पाहिली की तरुण-तरुणी लगबगीने अर्ज करतात. प्रत्येकजण आपलं कौशल्य, आवड आणि शिक्षण यांचा विचार करून अर्ज करण्याचा निर्णय घेतो. अशा वेळी वर्तमानपत्रातल्या जॉब्स कॉलममध्ये शोध घेताना एखाद्या भन्नाट ऑफरवर तुमची नजर पडली तर? ही ऑफर साधीसुधी नाही तर चक्क चोरीची ऑफर आहे. कोणीही शहाणा माणूस सफाईदार चोरांना नोकरी देणार नाही. याबाबतची जाहिरातही कुठे आढळणार नाही. पण लंडनमधल्या एका कंपनीने अशी ऑफर दिली आहे. गंमत म्हणजे नोकरीच्या ठिकाणीच चोरी करायची आहे. चोरी केल्यानंतर प्रतितास ६४ डॉलर मानधन दिलं जाईल. साहेबाच्या देशातल्या कपड्यांच्या दुकानाच्या एका मालकीणबाईने बार्क डॉट कॉमवर ही ऑफर दिली. चोराला प्रत्येक तासाला तिच्याच दुकानात चोरी करावी लागेल, अशी अट घालण्यात आली आहे. तिने असं का बरं केलं असावं? याचं कारण म्हणजे ती दुकानातल्या चोऱ्यांमुळे खूप वैतागली आहे. विशेषत: सुटीच्या काळात दुकानातल्या वस्तू चोरीला जाण्याचं प्रमाण वाढतं. यावर उपाय म्हणून तिने अशी जाहिरात दिली. चोराने चोरी केल्यानंतर त्याच्या कामाची पद्धत जाणून घेतली जाईल आणि त्याप्रमाणे सुरक्षेच्या उपाययोजना केल्या जातील, असं तिचं म्हणणं आहे. दुकानात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असले तरी चोरीच्या घटना घडतच आहेत. त्याचा सोक्षमोक्ष लावण्याचा तिचा प्रयत्न आहे. आता या नोकरीसाठी किती अर्ज येणार ते पहायचं!

## काश्मीरमध्ये का चालत नाही प्रीपेड कार्ड?

आज मोबाइल फोन ही आपल्या आयुष्याची गरज झाली आहे; पण जम्मू आणि काश्मीरसारख्या संवेदनशील भागात प्रीपेड सिम कार्ड वापरताना अडचणी येतात. अनेक पर्यटक आणि स्थानिकांचा याबाबत गोंधळ होतो. मग खरंच प्रीपेड सिम बंद आहेत का? आणि यामागे नेमकं कारण काय आहे?

प्रीपेड सिम कार्ड हे सोपे आणि स्वस्त असते. रिचार्ज करून लगेच वापरता येते. कागदपत्रेही फार कमी लागतात. यामुळे सामान्य माणसाला सोयीचे वाटते; पण याच सोयीत सुरक्षा यंत्रणांसाठी मोठी समस्या निर्माण होते. अशी सिम कार्डे सहज मिळतात आणि त्यांचा पूर्ण मागोवा घेणे कठीण होते.



जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अत्यंत संवेदनशील प्रदेश आहे. येथे कायदा आणि सुव्यवस्था राखणे मोठे आव्हान आहे. सरकारला भीती वाटते की प्रीपेड सिमचा वापर करून काही लोक अफवा पसरवू शकतात, चुकीची माहिती देतात किंवा इतर बेकायदेशीर कामे करू शकतात. म्हणून येथे प्रीपेड सिमवर कडक निर्बंध आहेत.

याउलट पोस्टपेड सिम कार्ड सुरक्षित मानले जाते. यासाठी पूर्ण वैयक्तिक माहिती, आधार, फोटो आणि इतर कागदपत्रे आवश्यक असतात. वापरकर्त्याचा पूर्ण तपशील नोंदवला जातो. त्यामुळे गरज पडल्यास सहज मागोवा घेता येतो. सुरक्षा यंत्रणांना हे सोपे जाते.

जम्मू-काश्मीरला फिरायला येत असाल तर काही गोष्टी लक्षात ठेवा. आगाऊ नियम समजून घ्या. केवायसी पूर्ण झालेली वैध सिम घ्या. पोस्टपेड कनेक्शन बरोबर ठेवा. सरकारी नियमांचे पालन करा. हे नियम फक्त जम्मू-काश्मीरपुरतेच नाहीत. आसाम, मणिपूर, नागालँड, मिझोरामसारख्या ईशान्येकडील राज्यांमध्येही सीमावर्ती भागात असे कडक नियम आहेत. कारण तेथेही सुरक्षा आव्हाने वेगळी आहेत.

# २०४७ साली जगभर सर्वच क्षेत्रांमध्ये भारताचाच प्रभाव आणि नेतृत्व ठळकपणे जाणवेल : आंतरराष्ट्रीय वक्ते दिपक करंजीकर

### ग.म.मुळे स्मृती व्याख्यानमालेत उलगडला भारताचा भविष्यातील सुवर्णकाळ

नगर – देशाच्या प्रगतीचा वाढलेला वेग लक्षात घेता २०४७ पर्यंत भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाची महासत्ता बनेल. देशाची अर्थव्यवस्था ३० ते ५० ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचेल, तर दरडोई उत्पन्न १२ हजार डॉलरपर्यंत जाईल. जगभर सर्वच क्षेत्रांमध्ये भारताचाच प्रभाव आणि नेतृत्व ठळकपणे जाणवेल. भारत महासत्ता बनण्याचा तो सुवर्णकाळ अनुभवण्याचे भाग्य आपल्या पिढीला लाभणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावेळी उपस्थित असलेल्या जनतेस जसा अभिमान आणि आनंद वाटला असेल, तशाच ऐतिहासिक भावनांचा अनुभव पुढील २१ वर्षांनी प्रत्येक भारतीयाला मिळणार आहे, असा विश्वास अर्थतज्ज्ञ व आंतरराष्ट्रीय वक्ते दिपक करंजीकर यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगरमध्ये सुरू असलेल्या ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेतील द्वितीय पुष्प दिपक करंजीकर यांनी '२०४७ सालचा विकसित भारत – संधी व आव्हाने' या विषयावर प्रभावी व्याख्यानाने गुंफले. या कार्यक्रमास उद्योजक रमेश फिरोदिया, उपमहापौर धनंजय जाधव, उद्योजक रोहन कुलकर्णी, विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे, सदस्य राजू लक्ष्मण यांच्यासह विविध क्षेत्रांतील नागरिक उपस्थित होते.


ग.म.मुळे स्मृती व्याख्यानमाचे द्विितीय पुष्प अर्थतज्ज्ञ दिपक करंजीकर यांनी '२०४७ सालचा विकसित भारत – संधी व आव्हाने' या विषयावर गुंफले.

दिपक करंजीकर यांनी आपल्या व्याख्यानात आर्थिक आणि सामाजिक विषय अत्यंत सोप्या व प्रभावी भाषेत मांडले. २०४७ सालापर्यंत भारत कसा समृद्ध, विकसित आणि आत्मनिर्भर राष्ट्र बनेल, याविषयी त्यांनी सविस्तर विवेचन केले. भारताच्या उज्ज्वल भवितव्याचे साक्षीदार होणे हे प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची आणि भाग्याची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले, २०४७ साली भारत जगातील विकसित राष्ट्र म्हून उदयास आले तरी देशावर मुघलांनी व इंग्रजांनी केलेले अत्याचार, अन्याय, आत्मवंचनांचे विस्मरण होता कामा नये. काळ सूड घेत असतो हे लक्षात ठेवा, छत्रपती शिवाजी महाराजांनी तेच केलं. २०४७ चा भारत आत्मगौरवी असेल. त्यावेळी खूप संधी उपलब्ध होणार आहेत. चार मुद्द्यांवर विकसित भारताची इमारत उभी आहे, युवा, महिला, गरीबी व चौथा खांब आहे शेतकरी. या चार गोष्टींवर काम केल्याशिवाय विकसित भारत होणे नाही, असे सांगून या चारही मुद्द्यांवर सविस्तर भाष्य त्यांनी केले.

२०४७ सालीच्या विकसित भारतात जशा चांगल्या संधी आहेत तसे अनेक आव्हानेही भारतापुढे उभे असणार आहेत. नौकरी–बेरोजगारीचा प्रश्न, वाढता कर्जबाजारीपणा, उध्वस्त होणारी कुटुंब व्यवस्था, ग्लोबल मार्केट फोर्सचा वाढता धोका. या माध्यमातून परकीय शक्ती कटकारस्थानाने भारताला कमजोर करण्यासाठी काम करत असल्याने भारतीयांनी धुंदीत व गाफील न राहता राज्त्रीय भावना जागृत ठेऊन काम करावे, असे आवाहन दीपक जोग यांनी केले.

प्रास्ताविकात सुधीर लांडगे यांनी विचार भारती काम करत असलेल्या ६ संकल्पनांची थोडक्यात माहिती दिली. मिलिंद कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. गौतम मुनोत, प्रा.अशोक सागडे व अमित खामकर यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. डॉ.ऋषिकेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. यश निंबाळकर यांनी आभार मानले. यावेळी बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, डॉ.रवींद्र साताळकर, डॉ. प्रकाश कांकरिया, मोहन मानधना, श्रीगोपाल धूत आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

# नागपूरच्या करण कोठारी ज्वेलर्सचे नगरमध्ये २९ ते ३१ मे दरम्यान 'विशेष दागिने प्रदर्शना'चे आयोजन




नगर – नागपूरमधील विश्वासार्ह आणि नामांकित ज्वेलरी ब्रँड 'करण कोठारी ज्वेलर्स' आता अहिल्यानगरमध्ये दागिने प्रदर्शनासाठी सज्ज झाला आहे. २९ ते ३१ मे या कालावधीत स्टेशन रोडवरील आयरीस प्रिमिअर हॉटेलमध्ये सकाळी १० नंतर हे प्रदर्शन असणार आहे. सोने, डायमंड दागिन्यांचे खास कलेक्शन आणि आकर्षक ऑफर्स प्रदर्शनाचे वैशिष्ट्य आहे. मौल्यवान खरेदी अतिशय चोखंदळपणे करणाऱ्या नगरकरांना आपल्या शहरातच निवांत वातावरणात संस्मरणीय खरेदी करण्याची संधी या प्रदर्शनामुळे मिळाली आहे.

पिढ्यानपिढ्या जपलेला विश्वास, शुद्धता आणि उत्कृष्ट कारागिरीसाठी ओळख असलेल्या करण कोठारी ज्वेलर्सकडून अहिल्यानगरकरांसाठी खास सोने आणि हिऱ्यांचे आकर्षक कलेक्शन सादर करण्यात येत आहे. करण कोठारी ज्वेलर्स येथे सर्व सोन्याचे दागिने १००% हॉलमार्क (एचयुआयडी) प्रमाणित असून हिऱ्यांचे दागिने जीआयए प्रमाणित आहेत. त्यामुळे ग्राहकांना उत्कृष्ट डिझाइन्ससह शुद्धतेची संपूर्ण खात्री मिळते.

प्रदर्शनात रॉयल ब्रायडल कलेक्शन, लग्नासाठी खास दागिन्यांचे सेट, एक्सक्लुझिव्ह डायमंड ज्वेलरी, पारंपरिक आणि राजेशाही डिझाइन्सची टेम्पल व अँटीक ज्वेलरी, दैनंदिन वापरासाठी हलके (लाईट वेट) व आकर्षक दागिने, राजेशाही थाटाचे पोल्की, कुंदन आणि जडाऊ दागिने असणार आहेत. अहिल्यानगर येथील ग्राहकांना प्रदर्शनादरम्यान खास ऑफर्सचा लाभ मिळणार आहे. डायमंड ज्वेलरीच्या मेकिंग चार्जेसवर १०० टक्के पर्यंत सूट, सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ३० टक्के पर्यंत सूट दिली जाईल.

करण कोठारी ज्वेलर्सची सेवा नागपूर (४ प्रमुख शोरूम्स), अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर अशा एकूण ७ ठिकाणी उपलब्ध आहे. आता हेच विश्वासार्ह ब्रँड अहिल्यानगरमध्ये प्रदर्शनाद्वारे ग्राहकांच्या भेटीस येत आहे.

ग्राहकांनी या विशेष प्रदर्शनाला भेट देऊन दागिन्यांचा अविस्मरणीय अनुभव घेण्याचे करण कोठारी ज्वेलर्सतर्फे करण्यात आले आहे.

# महाराष्ट्रात मतदार याद्यांची विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम

### ९ कोटी ८६ लाख मतदारांची होणार प्रत्यक्ष पडताळणी

नगर – भारत निवडणूक आयोगाने २४ जून २०२५ रोजी दिलेल्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्यासह एकूण १६ राज्ये व ३ केंद्रशासित प्रदेशांत विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेचा तिसरा टप्पा व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. संविधानाच्या कलम तीनशे सव्वीस प्रमाणे मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी व्यक्ती भारताचा नागरिक व वयाची अठरा वर्षे पूर्ण असणे आवश्यक या मूलभूत अटीची खातरजमा करण्याची जबाबदारी आयोगावर असून, या अंतर्गत राज्यातील एकूण नऊ कोटी शहाऐंशी लाख चव्वेचाळीस हजार चारशे तेरा मतदारांच्या तपशिलाची प्रत्यक्ष पडताळणी जून ते ऑक्टोबर या कालावधीत केली जाणार आहे. मतदार याद्या दोषविरहित व अचूक असण्याच्या दृष्टीने व सर्व पात्र मतदारांचे नाव समाविष्ट करण्यासाठी या कार्यक्रमात सर्व मतदारांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.

यापूर्वी देशामध्ये एकोणीसशे बावन ते छप्पन्न, सत्तावन्न, एकसष्ट, पासष्ट ते सहासष्ट, त्र्याऐंशी ते चौऱ्याऐंशी, सत्त्याऐंशी ते एकोणनव्वद, ब्याण्णव ते पंच्याण्णव व दोन हजार दोन ते दोन हजार चार या वर्षी विशेष सखोल पुनरीक्षण घेण्यात आले होते. मागील वीस वर्षांत केवळ विशेष संक्षिप्त पुनरीक्षण झाल्याने व शहरीकरणामुळे लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाल्यामुळे मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर समावेशन व वगळण्या झालेल्या आहेत. मतदारांनी नवीन जागी नाव नोंदविले मात्र जुन्या ठिकाणचे नाव न वगळल्याने दुबार नावे वाढल्याची शक्यता असल्याने लोकप्रतिनिधित्व अधिनियम एकोणीसशे पन्नासच्या कलम एकवीस नुसार आयोगाला मिळालेल्या अधिकारांतर्गत ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. देशात पहिल्या टप्प्यात बिहारमध्ये व दुसऱ्या टप्प्यात नऊ राज्ये व तीन केंद्रशासित प्रदेशांत हा कार्यक्रम राबविल्यानंतर आता तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्राचा समावेश असून, जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून राज्यासाठी वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार वीस ते एकोणतीस जून दोन हजार सव्वीस या कालावधीत गणना अर्जाची छपाई व एक लाख दोनशे त्रेपन्न मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाईल. त्यानंतर तीस जून ते एकोणतीस जुलै दरम्यान हे अधिकारी घरोघरी जाऊन सद्यस्थितीतील माहिती आधीच भरलेले गणना प्रपत्र मतदारांना वाटतील व भरलेले अर्ज परत घेतील. या प्रपत्रामध्ये मतदाराची किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची दोन हजार दोन ते दोन हजार चार मधील माहिती भरलेली असेल किंवा ती मतदाराला स्वतः भरता येईल व नवीन छायाचित्रही उपलब्ध करून देता येईल. प्रत्यक्ष गृहभेटीच्या वेळी जुनी माहिती भरणे शक्य व्हावे यासाठी सध्याच्या मतदारांची जुळवणी जुन्या नोंदींशी करण्याचे काम सुरू असून राज्यात आतापर्यंत बाहत्तर दशांश शून्य चार टक्के जुळवणी पूर्ण झाली आहे. मतदारांना आयोगाच्या संकेतस्थळावर केवळ राज्य, जिल्हा, विधानसभा मतदारसंघ व संपूर्ण नाव भरल्यास आपली जुनी माहिती सहज उपलब्ध होईल, जी त्यांनी अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्यावी. घर बंद आढळल्यास अधिकारी किमान तीन वेळा भेट देतील, तसेच योग्यरीत्या भरलेले व सही केलेले प्रपत्र गोळा करण्यासाठी ते पुन्हा भेट देतील.

मतदारांना आपले गणना प्रपत्र ऑनलाईन पद्धतीनेही भरता येणार असून, प्राप्त प्रपत्रांचा विचार करून पाच ऑगस्ट दोन हजार सव्वीस रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. या याद्यांवर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या काळात दावे व हरकती नोंदवता येतील व त्या तीन ऑक्टोबरपर्यंत निकालात काढल्या जातील. ज्या मतदारांची नावे जुन्या नोंदींशी जुळली नसतील किंवा त्रुटी असतील त्यांना मतदान नोंदणी अधिकाऱ्यांमार्फत नोटिसा पाठवल्या जातील. अशा व्यक्तींची यादी स्थानिक स्वराज्य संस्था, तहसीलदार कार्यालय, जिल्हा निवडणूक अधिकारी व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर संभाव्य कारणांसह प्रसिद्ध केली जाईल.

नोटिसा मिळालेल्या मतदारांना प्रपत्राच्या मागे दर्शविलेल्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल. ओळख पुरावा म्हणून आधार वापरले जाते, तथापि आधार कायदा दोन हजार सव्वीसच्या कलम नऊ प्रमाणे ते नागरिकत्वाचा पुरावा मानले जाणार नाही. ही सर्व कार्यवाही पूर्ण झाल्यावर ७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध होतील. या संपूर्ण प्रक्रियेत राजकीय पक्षांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून पारदर्शकता राखण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नियुक्त करण्याचे आवाहन आयोगाने केले आहे. राज्यात सर्व राजकीय पक्षांनी आतापर्यंत फक्त १ लाख १३ हजार ५५८ प्रतिनिधी नेमले आहेत. दुबार व मृत व्यक्तींची नावे वगळणे तसेच नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे अधिक अचूक होण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी जास्तीत जास्त प्रतिनिधी नियुक्त करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सविस्तर माहिती देण्यासाठी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे.

# बुरुडगाव येथे मोबाईल चोरीच्या संशयावरून तरुणाला बेदम मारहाण

नगर – मोबाईल चोरीच्या संशयावरून एका मजुराला प्लास्टिकचा पाईप आणि लाकडी काठीने अत्यंत निर्घृणपणे मारहाण केल्याची घटना बुरुडगाव परिसरामध्ये २६ मे रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास घडली आहे. या प्रकरणातील पीडित मजूर संदिप भानुदास बोरगे (वय ३५ वर्ष, रा. बुरुडगाव, ता. जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी संदिप बोरगे हे मजुरी करतात, २६ मे रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास ते बुरुडगाव येथील आपल्या राहत्या घरासमोर थांबलेले होते. त्याच वेळी तिथे राहणारा संशयित आरोपी सुनिल रंगनाथ पाचरणे (रा. बुरुडगाव, ता. नगर) हा त्या ठिकाणी आला. आरोपीच्या मुलाचा म्हणजेच गणेश पाचरणे याचा मोबाईल चोरीला गेला होता. हा मोबाईल फिर्यादीनेच चोरला असल्याचा खोटा संशय आरोपीच्या मनात होता.

याच कारणावरून आरोपी सुनिल पाचरणे याने फिर्यादी संदिप बोरगे यांना गाठून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. फिर्यादीने शिवीगाळ करण्यास विरोध केला असता, आरोपीने चिडून जाऊन जवळ असलेला प्लास्टिकचा पाईप हातामध्ये घेतला. त्या पाईपने फिर्यादीच्या पाठीवर आणि खांद्यावर जबर फटके मारण्यास सुरुवात केली. हा प्लास्टिकचा पाईप अंगावर मारताना तुटला. त्यानंतरही आरोपीचा राग शांत झाला नाही. त्याने बाजूलाच पडलेली एक लाकडी काठी उचलली आणि पुन्हा पाठीवर आणि खांद्यावर मारहाण केली.

त्यानंतर आरोपीने फिर्यादीला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी आणि हाताने तोंडात तसेच डोळ्यावर मारहाण करून गंभीर दुखापत केली. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे फिर्यादी गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर फिर्यादीने रात्री पोलीस ठाण्यात धाव घेऊन रीतसर तक्रार नोंदवली.

या तक्रारीवरून नगर तालुका पोलिसांनी आरोपी सुनिल रंगनाथ पाचरणे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ११८ (१), ११५ (२), ३५२ आणि ३५१ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस अंमलदार काळे या करत आहेत.

# भिंगारमध्ये पूर्ववैमनस्यातून तरुणावर प्राणघातक हल्ला

### कोयता आणि विटांनी बेदम मारहाण, ४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – भिंगार परिसरातील नगर–पाथर्डी रस्त्यावरील प्रकाश हॉटेल समोर २५ मे रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास एका तरुणावर जुन्या कारणावरून चौघांनी मिळून जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. या मारहाणीत गणेश सुरेश आळकुटे (वय ३०, रा.यशवंत नगर डेअरी फार्म, भिंगार) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

फिर्यादी गणेश आळकुटे हे २५ मे रोजी रात्री रस्त्यावरून जात असताना आरोपी योगेश कांबळे, अभि वाघेला, सनी निकाळजे आणि तारा पाटोळे (सर्व रा. भिंगार) यांनी त्याला विनाकारण अडवून अत्यंत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर सर्व आरोपींनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. वाद वाढल्याने आरोपी तारा पाटोळे याने जवळ असलेला लोखंडी कोयता काढून फिर्यादीच्या डोक्यावर आणि अंगावर वार केले. तर उर्वरित तीन आरोपींनी परिसरात पडलेल्या विटांनी फिर्यादीला बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले. घटनेनंतर जखमी फिर्यादीला तात्काळ जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. रुग्णालयाकडून वैद्यकीय अहवाल आणि अधिकृत जबाब प्राप्त झाल्यानंतर भिंगार कॅम्प पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास साहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रेणी पोलीस उपनिरीक्षक अकोलकर करत आहेत.

# अहिल्यानगर महापालिका क्षेत्रात 'डिजिटल जनगणना' वेगाने सुरु


अहिल्यानगर महापालिका क्षेत्रात 'डिजिटल जनगणनेबाबत आयोजित बैठक.

नगर – भारत सरकारच्या गृहमंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या जगातील सर्वात मोठ्या डिजिटल जनगणना मोहिमेचे काम सध्या अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात वेगाने सुरू आहे. आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाला अधिक गती मिळाली असून प्रशासन, पर्यवेक्षक, प्रभाग अधिकारी व प्रगणक यांच्या समन्वयातून जनगणनेची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर पर्यवेक्षक व प्रभाग अधिकाऱ्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठी मनपाच्या जनगणना कक्षात बैठक आयोजित करण्यात आली. जनगणना प्रक्रियेतील अचूकता, कामाचा वेग व डिजिटल प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जनगणना ही देशाच्या नियोजनासाठी महत्त्वाची प्रक्रिया असल्याने प्रत्येक नोंदीची अचूकता व वेळेचे नियोजन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कामात अधिक समन्वय व कार्यक्षमता राखण्याच्या सूचना देत त्यांनी २३ मे ते १४ जून या कालावधीतील पुढील कामाचा आराखडाही सादर केला.

साहाय्यक आयुक्त मेहेर लहारे यांनी पूर्ण झालेली गणनाघरे, प्रणालीमध्ये अद्ययावत झालेली माहिती, एचएलओ पमधील अडचणी व त्यावरील उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. क्षेत्रीय कामातील तांत्रिक बाबींवरही त्यांनी सूचना दिल्या.

डिजिटल प्रणाली अधिक परिणामकारक करण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू असल्याचे जनगणना विभाग प्रमुख राकेश कोतकर यांनी नमूद केले. बैठकीत विविध पर्यवेक्षकांनी प्रत्यक्ष जनगणनेदरम्यान येणाऱ्या तांत्रिक अडचणी तसेच नागरिकांशी संवादातील समस्या मांडल्या. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रगणकांच्या कार्याचाही यावेळी गौरव करण्यात आला.शहरातील सर्व प्रभागांतील पर्यवेक्षक व प्रभाग अधिकारी बैठकीस उपस्थित होते. डिजिटल जनगणना मोहिमेला प्रशासनाचे प्रभावी नियोजन व भक्कम पाठबळ मिळत असल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले.

# कोठला परिसरातून महिंद्रा स्कॉर्पिओची चोरी; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – नगर शहरातील कोठला परिसरातील जय माता दी मंदिरासमोरील पटंगणातून ५ लाख रुपये किमतीची महिंद्रा स्कॉर्पिओ गाडी चोरीला गेल्याची घटना २४ मे रोजी रात्री ११:३० ते २५ मे रोजी सकाळी १०:४० च्या दरम्यान घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अर्शद अय्युब शेख (वय ३४, रा. बडी मज्जीद जवळ, मुकुंदनगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांनी आपली पांढऱ्या रंगाची महिंद्रा स्कॉर्पिओ गाडी (क्र.एमएच २१ व्ही एफ ३७५१) कोठला येथील जय माता दी मंदिरासमोरील पटंगणात पार्क केली होती. ते पुन्हा तिथे आले असता, त्यांना गाडी जागेवर दिसून आली नाही. अज्ञात चोरट्याने गाडी सुरक्षित लॉक केलेली असतानाही ती चोरून नेल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकरणी शेख यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०५(ब) नुसार चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांवर ३० जूनपर्यंत एचएसआरपी नंबर प्लेट बसवावी

नगर – केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील तरतुदीनुसार १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक असून वाहनधारकांनी ३० जून पर्यंत एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धार्थ ठोके यांनी केले आहे.

केंद्रीय मोटार वाहन नियमांनुसार १ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत झालेल्या वाहनांनाही एचएसआरपी बसविण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत.

जुन्या वाहनांवर एचएसआरपी बसविण्याचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असल्याने परिवहन आयुक्तांनी यापूर्वी मुदतवाढ दिली होती. त्यानंतर आता १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांवर एचएसआरपी बसविण्यासाठी ३० जून पर्यंत अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. १ जुलै २०२६ पासून एचएसआरपी न बसविलेल्या सर्व वाहनांवर (जुनी व नवी) मोटार वाहन कायद्यानुसार वायूवेग पथकाद्वारे कारवाई करण्यात येणार असून वाहनधारकांनी अंतिम मुदतीची प्रतीक्षा न करता तातडीने एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहनही श्री. ठोके यांनी केले आहे.

एचएसआरपीसाठी अर्ज करताना महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाच्या transport.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा. वाहनांची ओळख, सुरक्षितता आणि बनावट क्रमांक प्लेटला आळा घालण्यासाठी एचएसआरपी प्रणाली महत्त्वाची असल्याचेही कळविण्यात आले आहे.

# 'आभा' कार्ड सक्ती करण्यापूर्वी सुविधांची माहिती द्या

### महेश पाडेकर यांची मागणी; हॉस्पिटलची यादी आणि नोडल ऑफिसरची माहिती 'शिक्षक भारती' संघटनेस देण्याचे शिक्षण विभागाला आवाहन

नगर – राज्यातील १०० टक्के अनुदानित खासगी शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी 'आभा' (ABHA) कार्ड काढणे बंधनकारक करण्याच्या निर्णयाचे पडसाद उमटू लागले आहेत. केवळ कार्ड काढण्याची सक्ती न करता, ही योजना प्रत्यक्ष राबवणाऱ्या हॉस्पिटलची माहिती आणि तेथील नोडल ऑफिसर्सची यादी 'शिक्षक भारती' संघटनेस त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी प्रा. महेश पाडेकर यांनी केली आहे.

काय आहे पेच? माध्यमिक शिक्षण विभागाने २५ मे रोजी काढलेल्या पत्रानुसार, सर्व कर्मचाऱ्यांचे ५ लाख रुपयांपर्यंतचे वैद्यकीय देयक प्रतिपूर्तीसाठी स्वीकारले जाणार नाही. या निर्णयामुळे शिक्षक पूर्णपणे महात्मा फुले जन आरोग्य योजनेवर अवलंबून राहणार आहेत. मात्र, जिल्ह्यातील कोणत्या तालुक्यात कोणती अंगीकृत रुग्णालये आहेत आणि तिथे कोणती उपचार सुविधा मिळते, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

## प्रा. महेश पाडेकर यांनी निवेदनात उपस्थित केलेले मुद्दे

नोडल ऑफिसरची माहिती : प्रत्येक अंगीकृत रुग्णालयात योजनेच्या समन्वयासाठी असलेल्या नोडल ऑफिसरचे नाव आणि मोबाईल नंबर संघटनेस द्यावा, जेणेकरून शिक्षकांना आपत्कालीन परिस्थितीत मदत मिळेल. हॉस्पिटलची तालुका निहाय यादी : जिल्ह्यात तालुकानिहाय कोणती रुग्णालये या योजनेअंतर्गत येतात, त्यांची अद्ययावत यादी प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. उपचारांची व्याप्ती : संबंधित रुग्णालयांमध्ये नेमके कोणते आजार मोफत उपचारांच्या कक्षेत येतात, याचे स्पष्टीकरण प्रशासनाने द्यावे. संभ्रम दूर करण्यासाठी कार्यशाळेची मागणी केवळ ऑनलाईन लिंक देऊन प्रशासनाने आपली जबाबदारी पार पाडली आहे, परंतु या तांत्रिक बाबींमुळे शिक्षक वर्गात मोठा संभ्रम आहे. हा संभ्रम दूर करण्यासाठी आणि योजनेचा प्रत्यक्ष लाभ कसा घ्यावा, याचे प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने व शिक्षण विभागाने तातडीने कार्यशाळेचे आयोजन करावे, अशी मागणीही प्रा. पाडेकर यांनी केली आहे.

प्रशासनाने या मागणीची दखल न घेतल्यास आगामी काळात शिक्षक भारती संघटनेच्या वतीने अधिक तीव्र पाठपुरावा केला जाण्याचे संकेत मिळत आहेत. सदर मागणीसाठी आमदार कपिल पाटील, राज्य अध्यक्ष अशोक बेलसरे, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, विनाअनुदान कृती समिती राज्याध्यक्ष जयवंत भाबड, सचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, महिला अध्यक्ष रूपालीताई बोरुडे, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, समन्वयक शरद पवार, प्रवीण काळे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात, संपत वाळके, दिगंबर देसाई, सचिव वंदना जाधव, कल्पना चौधरी, मफीज इनामदार, दीपक फापाळे, गणपत धुमाळ, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, प्रवीण मालुंजकर, श्याम जगताप आदी पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दिला. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या आरोग्याचा हा प्रश्न गंभीर आहे. प्रशासनाने जर हॉस्पिटल आणि नोडल ऑफिसरची सविस्तर माहिती 'शिक्षक भारती' संघटनेस दिली, तर आम्ही ती माहिती प्रत्येक शेवटच्या शिक्षकापर्यंत पोहोचवू शकू. पारदर्शकता नसेल तर या योजनेचा फायदा काय?, असे शिक्षक भारती पुणे विभागाचे कार्याध्यक्ष प्रा. महेश विष्णू पाडेकर म्हणाले.

